RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२४१ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.२७ नोव्हेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## शिंदे समितीचे काम संपले, ती बरखास्त करा कुणबी दाखलेही रद्द करा; छगन भुजबळांची मागणी


**दि. २७ विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी आज पुन्हा एकदा पुण्यात पत्रकार परिषद घेत शिंदे समिती बरखास्त करण्याची मागणी केली आहे. शिंदे समितीला मराठवाड्यातील दाखले तपासण्याची जबाबदारी देण्यात आली होती ती आता पूर्ण झाली आहे, त्यामुळे आता ती बरखास्त करावी, तसेच सध्या जे कुणबी दाखले देण्यात येत आहेत तेही रद्द करा अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच शिंदे समितीने दिलेला अहवालदेखील आम्ही मान्य करणार नाही अशी भूमिका भुजबळ यांनी घेतली आहे.

राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी जस्टिस दिपक शिंदे यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या समितीवर टीकेचा बाण सोडताना आता तिची गरज राहिली नसून ती तत्काळ बरखास्त करण्याची मागणी केली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे त्यांनी जो अहवाल तयार केला आहे तो देखील स्वीकारणार नसल्याची भूमिका भुजबळांनी घेतल्यानं नव्या वादाला तोंड फुटलं आहे.

**शिंदे समितीची गरज काय?**

नुकतीच हिंगोली येथे झालेल्या सभेदरम्यान जस्टिस शिंदे समितीवर टीका करताना या समितीची गरजचं काय असा सवाल उपस्थित केला होता. शिवाय या समितीला मराठवाड्यातील निजामकाळात कुणबी नोंदी होत्या का हे



शोधण्याची जबाबदारी दिली असताना त्यांनी राज्यातील इतर जिल्ह्यात देखील हे काम केलंच कसं असा खडा सवाल उपस्थित केला आहे.

**कुणबी दाखले रद्द करा**

एकीकडे समिती बरखास्त करा ही मागणी लावून धरताना दुसरीकडे जे कुणबी दाखले देण्यात येत आहेत तेच रद्द करा अशी देखील मागणी भुजबळ यांनी केली आहे. यामुळे आता मराठा विरुद्ध ओबीसी वाद आणखी पेटण्याची शक्यता आहे. इतकचं नाही तर भुजबळांनी खोटी कागदपत्रे सादर करुन प्रमाणपत्र घेण्यात येत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. तसे पुरावेच थेट मुख्यमंत्र्यांना दिल्याचं म्हंटलं आहे.

दिवसेंदिवस भुजबळ विरुद्ध जरांगे वाद वाढत असताना विरोधकांनी मात्र राज्यातील वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न कुणीही करु नये असं म्हटलं आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी छगन भुजबळ यांना राज्यातील वातावरण बिघडू नये यासाठी काळजी घेण्याची विनंती केली आहे. मात्र छगन भुजबळ हे आपल्या मतांवर ठाम असल्याचं पाहायला मिळत आहे.

राज्यात मागील काही दिवसांपासून मराठा विरुद्ध ओबीसी निर्माण झालेला वाद दिवसेंदिवस वाढत जाण्याची दाट शक्यता आहे. आश्चर्याची बाब इतकीच आहे की छगन भुजबळ हे सध्याच्या कॅबिनेटमध्ये मंत्री आहेत. तरी देखील त्यांना आपल्या मागण्या सरकारसमोर ठेवण्यासाठी व्यासपीठाचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे सध्याच्या मंत्रिमंडळात ओबीसी विषयावरुन सरकारमधील मंत्र्यांमध्ये एकवाक्यता नाही का असा सवाल उपस्थित होत आहे.

## जालना दंगलीमागे संजय राऊत, राष्ट्रवादीचे युवा नेते? संजय शिरसाटांचा मोठा दावा

### दंगलीसंदर्भात अधिवेशनात आवाज उठवणार असून सगळे पुरावे मांडणार

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक छत्रपती संभाजीनगर**

अंतरवाली सराटी इथं झालेल्या लाठीहल्ला प्रकरणात तीन जणांना पोलिसांनी अटक केली आहे. यातील ऋषिकेश बेदरे याच्याकडे पोलिसांना पिस्तुल सापडले होते. शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी या प्रकरणी उद्धव ठाकरे गट आणि शरद पवार गटावर दंगलीचे आरोप केले आहेत.



छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये बोलताना संजय शिरसाट म्हणाले की, अंतरवाली सराटी येथे झालेल्या घटनेनंतर राज्यात पडसाद पडलेले बघायला मिळाले. मुळात जालन्यात दंगल कशी घडेल, यासाठी काही बडे नेते योजना आखात होते.. बनवलेला प्लॅन अमलात आणला, घटनाक्रम पाहिला तर लक्षात येईल. कुणाच्या मृत्यूनंतरही कधीच न जाणारे बडे नेते हे तातडीने त्याठिकाणी पोहचले होते.

शिरसाट पुढे म्हणाले, दंगल घडवणाऱ्यांवर आता कारवाई केली जाणार आहे. राज्यात दंगली घडवून सरकार कसे बदनाम होईल हा प्रयत्न केला गेला. सरकारला विनंती आहे, की मुख्य सूत्रधार शोधले पाहिजेत, पिस्टल मिळालेला आरोपी आहे का मोहरा आहे, हे शोधलं पाहिजे.

शिरसाट पुढे बोलले, ज्यांच्याकडे पिस्टल आढळली त्याला सुपारी देण्यात आली होती. मराठा आमदार सोळंके हे मराठा असूनही त्यांचे घर कुणी जाळले? दंगलीसंदर्भात आपण अधिवेशनात आवाज उठवणार असून सगळे पुरावे मांडणार आहोत. माझ्याकडे सगळे व्हिडीओ आणि फोटो आले आहेत. रोहित पवार काय म्हणतात हे चौकशीत समोर येईल, त्या भागात कोण बैठक घेत होते हे समोर येईल. स्वतः करायचं आणि नामंनिराळं व्हायचं. दंगलीमागे संजय राऊत, राष्ट्रवादीचे युवा नेते आणि माजी मंत्री आहेत का? हे तपासामध्ये उघड होईल, असा इशारा शिरसाट यांनी शरद पवार गट आणि उद्धव ठाकरे गटाच्या नेत्यांना दिला.

## ...तर आवश्यक ते बदलदेखील करू; महायुतीच्या जागा वाटपाबाबत फडणवीसांचे स्पष्टीकरण

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

आगामी लोकसभेसाठी महायुतीत जागावाटप ठरल्याच्या बातम्या माध्यमांमध्ये झळकल्या होत्या. भाजप लोकसभेच्या २६ जागा लढवणार आहे, तर शिवसेना ( शिंदे गट) आणि राष्ट्रवादी ( अजित पवार गट) २२ जागा लढवणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत समोर आले होते. आता याचाच पुनरुच्चार करत फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले आहे. नागपुरात माध्यमांशी बोलत होते.

फडणवीस म्हणाले की, याबाबत मी आधीही स्पष्ट केले आहे. आता पुन्हा एकदा स्पष्ट करतो. आमच्या चर्चा अजून व्हायच्या आहेत. फॉर्म्युला चर्चेनंतरच ठरेल. पण जो ज्या जागा लढला आहे, त्या जागा त्याच्याकडे जाव्यात असा त्या



चर्चेचा आधार असेल. पण याचा अर्थ ते आहे असा नाही. तर त्यात आवश्यक ते बदलदेखील आम्ही आपापसात बसून बोलून करणार आहोत, असे स्पष्टीकरण फडणवीसांनी यावेळी दिले.

कालपासून राज्यात झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपीट झाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. यावर फडणवीस म्हणाले की, कुठे काय परिस्थिती आहे, कुठे किती नुकसान झाले याचा एक प्राथमिक अहवाल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी पाठवावा. त्यानंतर निश्चितपणे राज्य सरकार हे शेतकऱ्यांना मदत करेलच. फडणवीस म्हणाले की, आता वेगवेगळ्या ठिकाणी रब्बी पिकाच्या वेगवेगळ्या स्टेजेस आहेत. जिथे या अवकाळी पावसमुळे नुकसान होईल त्याठिकाणी आपण निश्चितपणे मदत करणार, असे आश्वासनही फडणवीस यांनी यावेळी दिले.

फडणवीस म्हणाले की, नागपूर येथील विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन पार पडल्यानंतर लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला सुरूवात होणार आहे. अधिवेशनानंतर भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांच्या मतदारसंघनिहाय बैठका घेण्याचा आमचा विचार आहे. जर एखाद्या मतदारसंघात भाजपचा उमेदवार निवडणूक लढवत असेल, तर शिवसेना आणि राष्ट्रवादीचे कार्यकर्ते त्या उमेदवाराचा आपल्या पक्षाचा उमेदवार असल्याप्रमाणे प्रचार करतील. हा नियम भाजप कार्यकर्त्यांना शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या उमेदवारांबाबतही लागू होईल.

## महाराष्ट्रात गारपिटीसह मुसळधार पावसाची शक्यता; शेतकऱ्यांची चिंता वाढली

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

मुंबईसह राज्यभरात ठिकठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली असतानाच काही ठिकाणी गारपिटीनेही तडाखा दिला आहे. रविवारच्या तडाख्यानंतर सोमवारी देखील राज्यात बहुतांश ठिकाणी अवकाळी पावसासह गारपीटीची शक्यता वर्तवण्यात आली आहे, अशी माहिती हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली. दरम्यान, मुंबई शहर आणि उपनगरात पडलेल्या पावसामुळे हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक सुधारला असून मुंबईतील प्रदूषण कमी झाले आहे. शिवाय



सोमवारी संध्याकाळी मुंबई शहर उपनगरात पावसाच्या सरी कोसळतील, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

विदर्भात पावसाचा जोर कायम आहे. यवतमाळ जिल्ह्यात मध्यरात्रीपासून अवकाळी पावसाची रिपरिप सुरूच आहे. हिंगोली जिल्ह्यात मध्यरात्रीपासून अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस आहे. विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस सुरूच आहे. वाशिम जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह रात्री एक वाजता अवकाळी पाऊस झाला आहे. या पावसामुळे तूर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तुरीचे पीक सध्या फुलोरा अवस्थेत असल्याने पावसामुळे फुलगळ होणार आहे. यामुळे उत्पादनात मोठी घट येण्याची शक्यता आहे. तर इतर फळं आणि भाजीपाला पिकाचेही काही प्रमाणात नुकसान झाले आहे.

### पावसाची शक्यता

मराठवाड्यातील सर्व ८ जिल्ह्यात मध्यम ते मुसळधार, विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यात जोरदार, मुंबईसह कोकणातील सर्व ७ + खान्देशसह मध्य महाराष्ट्रातील १० अशा १७ जिल्ह्यात मध्यम, पावसाची शक्यता जाणवते.

### गारपिटीची शक्यता

विदर्भातील सर्व ११ (विशेषतः अकोला, बुलढाणा, वाशिम) व मराठवाड्यातील ६ जिल्हे (छत्रपती संभाजी नगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड व नांदेड) अशा एकूण १७ जिल्ह्यात गारपीट होण्याची शक्यता आहे.

## आरोग्य विभागाच्या ३५ हजार कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप चालूच; ३२ व्या दिवशी तोडगा नाही!

**दि. २७ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

आरोग्य विभागाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काम करणाऱ्या सुमारे ३५ हजार कंत्राटी डॉक्टर- कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या बेमुदत संपाच्या ३२ व्या दिवशीही संपाबाबत कोणताही तोडगा निघालेला नाही. संपकरी कर्मचाऱ्यांनी १२ डिसेंबर रोजी नागपूर अधिवेशनावर मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला असून या संपामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांचे अतोनात हाल होत असल्याचे आरोग्य विभागातील ज्येष्ठ डॉक्टरांचे म्हणणे आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान ही योजना राज्यात २००५ पासून सुरू झाली तेव्हापासून डॉक्टर, तंत्रज्ञ तसेच आरोग्य विषयक वेगवेगळ्या कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने या अभियानात भरती करण्यात येत आहे. समान काम समान वेतन तसेच सेवेत कायम करण्यात यावे ही मागणी करत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काम करणाऱ्या ३५ हजार कर्मचाऱ्यांनी २२ ऑक्टोबर पासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरु केले आहे.

## शिवसेनेच्या दोन आमदारांची अपात्रतेतून सुटकेची शक्यता

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाच्या सुनावणीला आता वेग आला आहे. विधानसभा अध्यक्षांसमोर सध्या सुनावणी पार पडत आहे. मात्र शिनसेनेच्या दोन आमदारांची अपात्रता प्रकरणातून सुटका होण्याची शक्यता आहे. शिवसेनेच्या आमदार मनिषा कायंदे आणि विप्लव बजोरिया यांच्या विधानपरिषद आमदारकीचा कार्यकाळ पुढील काही महिन्यात संपुष्टात येणार असल्याने त्यांची या



अपात्रतेच्या धोक्यापासून सुटका होण्याची चिन्हे आहेत.

विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार डॉ. मनिषा कायंदे आणि विप्लव बजोरिया यांनी काही दिवसांपूर्वी शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यांच्याविरोधात याचिका दाखल करण्यात आली आहे. ही याचिकाही प्रलंबित आहे. विधानपरिषद शिवसेना आमदार अपात्रता याचिकांवरील सुनावणीबाबत अनिश्चिता आहे. सभापतींची निवड झाल्यावरच ती होण्याची चिन्हे आहेत.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांविरोधातील याचिकांसंदर्भात संबंधितांना पुढील आठवड्यात नोटीसा बजावल्या जाणार असून याचिकेवर २०२४च्या जानेवारीमध्ये सुनावणी होण्याची शक्यता आहे.

## राज्याला तीन महिने आरोग्य संचालकच नाहीत; आरोग्य विभाग हतबल, डॉक्टर संतप्त!

**दि. २७ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी कोणतेही सबळ कारण न देता आरोग्य विभागाच्या दोन्ही हंगामी संचालकांना पदमुक्त केले त्याला आता तीन महिने उलटले असून आरोग्य संचालकांची नियुक्ती होत नसल्यामुळे आरोग्य विभागाच्या डॉक्टरांमध्ये तीव्र नाराजी आहे. हे कमी म्हणून आरोग्य संचालक (शहर) या शहरी आरोग्यासाठीच्या तिसऱ्या संचालपदाची निर्मिती केली त्याला तीन वर्षे उलटली असून आजपर्यंत हे पद केवळ कागदावरच आहे. राज्याला गेले तीन महिने आरोग्य संचालकच नसल्यामुळे आरोग्य विभागाच्या डॉक्टरांमध्ये कमालीचा संताप तसेच नैराश्य निर्माण झाल्याचे चित्र एकीकडे आहे तर दुसरीकडे राष्ट्रीय आरोग्य अभियायानातील ३५ हजार डॉक्टर- कर्मचार्यांचा संपामुळे ग्रामीण भागातील जनतेचे हाल होत असताना संपाकडे पाहाण्यास कोणीच तयार नाही.

## भाजपच्या खासदारांवर दगडफेक होम मिनिस्ट्रीचा इंटेलिजन्स करतोय काय?

### सुप्रिया सुळेंचा राज्यसरकारला टोला

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

काही जिल्ह्यांमध्ये दुष्काळाची परिस्थिती आहे तर काही जिल्ह्यांमध्ये अवकाळीने नुकसान झाले आहे. राज्यातील शेतकरी अडचणीत आहेत, संवेदनशील सरकारने कामाला लागले पाहिजे, असा खोचक टोला सुप्रिया सुळे यांनी शिंदे फडणवीस पवार सरकारला लगावला आहे. प्रशासकीय यंत्रणा कामाला लावा आणि जास्तीत जास्त निधी केंद्र सरकारने राज्याला देऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी ही



आमची मागणी आहे, असे सुळे म्हणाल्या. तसेच मी हा विषय ताकदीने लोकसभेत मांडेन असे आश्वासनही त्यांनी दिले.

राज्यात अनेक ठिकाणी दगडफेक होताना दिसतेय, भाजपच्या खासदारांवर ही दगडफेक झाली. होम मिनिस्ट्रीचा इंटेलिजन्स करतोय काय? वैयक्तिक माझे फडणवीसांशी भांडण नाही, हे भांडण वैचारिक आहे. ते पहिल्यांदा मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांच्याकडे गृह मंत्रालय होते, क्राईम कॅपिटल तेव्हा नागपूर ओळखले जायचे. ते मंत्री असताना क्राईम वाढतो कसा? हे मी नाही डेटा बोलतोय अशी टीका सुळे यांनी गृहमंत्री फडणवीस यांच्यावर केली.

आरक्षणावर सरकारची नेमकी भूमिका काय हे स्पष्ट झाले पाहिजे. निर्णयप्रक्रियेचे अधिकार मुख्यमंत्र्यांकडे आहेत. डीसीएम १ आणि डीसीएम २ यांना विचारावे, मुख्यमंत्र्यांना विचारावे. राष्ट्रवादी पक्ष मराठा, मुस्लिम, लिंगायत सर्वांच्या मागे आहे. या सरकारच्या निर्णयात स्पष्टता येत नाहीय. परंतू, राष्ट्रवादीच्या भूमिकेत सातत्य आहे, असेही सुळे म्हणाल्या.

## आमचे दोन तुकडे झाले, आधे इथर, आधे उधर, बाकी सब, गुलाबराव पाटलांची डायलॉगबाजी; म्हणाले, राज्यात आमची....

**दि. २७ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राज्याचे पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री तथा शिवसेनेच्या शिंदे गटातील नेते गुलाबराव पाटील हे त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठी आणि भाषणांमुळे प्रसिद्ध आहेत. आपल्या भाषणांमध्ये ते हिंदी चित्रपटांमधील प्रसिद्ध संवाद बोलून दाखवतात. जळगावातील एका सभेतील गुलाबराव पाटील यांच्या भाषणाचा व्हिडीओ समोर आला आहे. या सभेत शिवसेनेच्या सध्याच्या स्थितीवर भाष्य करताना गुलाबराव पाटील यांनी डायलॉगबाजी केली. गुलाबराव पाटील यांनी बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या दबंग चित्रपटातील लोकप्रिय संवाद बोलून दाखवला.

गुलाबराव पाटील म्हणाले, केंद्रात कोणाला मदत लागत असेल तर भाजपावाले आपले मोठे भाऊ तिथे उपस्थित आहेत. आम्ही शिंदे गटाचे लोक आहोत. आमचे दोन तुकडे झाले आहेत. आधे इधर जाओ, आधे उधर जाओ, बाकी मेरे साथ आ जाओ, अशी स्थिती आहे. केंद्रात कोणाला मदत लागत असेल तर भाजपा इथं उपस्थित आहे. आम्हीपण त्यांच्याबरोबर युतीत आहोत. आमची तिथेही चंचू ताकद आहे.

दोन दिवसांपूर्वी जळगावातल्या धरणगाव येथील एका कार्यक्रमात गुलाबराव पाटील यांनी अशीच शाब्दिक फटकेबाजी केली होती. माझ्या नशिबात असेल तर मी पुन्हा निवडून येईन अन्यथा येणार नाही असं पाटील म्हणाले होते.

## संपादकीय ......

# राज्यात ३० टक्के दुधात भेसळ

आता दुधात भेसळ होत असल्याची कबुली दस्तुरखुद्द दुग्ध विकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनीच दिली आहे. राज्यात ३० टक्के दुधात भेसळ होत असल्याची माहिती त्यांनी दूध उत्पादकांच्या मुंबईत झालेल्या बैठकीत दिली. दूध भेसळ शोधण्याची जबाबदारी खरे तर अन्न व औषध प्रशासन विभागाकडे आहे, परंतु अशी भेसळ शोधण्यात अन्न व औषध प्रशासनाला अपयश आल्यामुळे आता भेसळ रोखण्याचे काम दुग्ध विकास विभागावरच सोपवण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

महत्वाचा मुद्दा हा आहे की, दुग्ध विकास मंत्र्यांना अचानक दुधाची भेसळ कशी पुढे आणाविशी वाटली? त्यांनी त्यावर भाष्य करण्यापेक्षा भेसळ रोखण्यासाठी थेट उपाययोजना का केल्या नाहीत? की दूध भेसळीचे खापर अन्न व औषध प्रशासनावर फोडून भेसळ शोधण्याचे अधिकार स्वत:च्या विभागाकडे घेण्याची ही चाल आहे? असेही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहेत. दुधातील भेसळ रोखण्यात अन्न व औषध प्रशासनाला अपयश येण्याचे मूळ कारण आहे या विभागातील मनुष्यबळाचा अभाव. या विभागात प्रथम श्रेणी अधिकार्यापासून ते चतुर्थश्रेणी कर्मचार्यांपर्यंतची ३५ टक्के पदे रिक्त असल्यामुळे उपलब्ध कर्मचार्यांमध्ये जमेल तशी कारवाई करण्यात येते.शरीराला हानीकारक अशा अनेक घटकांची भेसळ दुधात करून ते विकणे हे मानवी आरोग्यासाठी अतिशय घातक ठरते. दुधात केवळ पाणी टाकून भेसळ केली जात नाही, तर दुधाला सफेद आणि घट्ट बनवण्याकरिता साबण, डिटर्जंट पावडर आणि खूप असे हानीकारक केमिकल्स त्यात मिसळले जातात. बर्याचदा आपल्याला भेसळयुक्त दूध आणि शुद्ध दूध यामधील फरक ओळखता येणे कठीण जाते. अनेकांचा समज असतो की, पिशवीमधील दूध हे शुद्ध असते, परंतु बर्याचदा यामध्येदेखील सिंथेटिक स्वरूपाचे केमिकल मिसळले जाते. काही लोक दुधात स्टार्च, डिटर्जंट मिसळून देतात. यामुळे दुधाचा दर्जा मोठ्या प्रमाणावर खालावतो. वर्षानुवर्षे शेतकरी आणि ग्राहकांच्या जीवाशी हा भेसळीचा खेळ सुरू आहे.

आय.सी.एम.आर.च्या अहवालानुसार भेसळयुक्त दुधाचे सेवन केल्यास कर्करोग आणि क्षयरोग होऊ शकतो. युरियाची भेसळ केल्याने त्यातील नायट्रोजन या घटकामुळे मूत्रपिंड, हृदय व यकृत यांसारखे अवयव निकामी होण्याची भीती असते, तसेच कॉस्टिक सोड्याच्या भेसळीमुळे दुधातील शरीरवाढीसाठी आवश्यक असणारे लायसिन हे अमिनो आम्ल शरीरास उपलब्ध होत नाही. परिणामी लहान मुलांच्या शरीरवाढीवर परिणाम होऊन शरीराची वाढ खुंटते. यामधील सोडिअमसारख्या घटकाचा मानवी शरीरावर परिणाम होऊन उच्च रक्तदाब व हृदय विकारासारखे आजार जडतात. सिंथेटिक दूध पोटात गेल्यास हाडांनाही त्रास होऊ शकतो. विशेषत: लहान मुले आणि गरोदर महिलांना याचा जास्त फटका बसतो.

राज्यात भेसळयुक्त दुधाला पायबंद घालण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात समिती गठीत करण्याचा निर्णय काही महिन्यांपूर्वीच सरकारने घेतला. दूध व दुग्धजन्य पदार्थातील भेसळ रोखण्यासाठी या समितीने धडक तपासणी मोहीम हाती घ्यावी, दूध व दुग्धजन्य पदार्थाच्या भेसळीत सहभागी असणार्या व्यक्ती अथवा आस्थापनाच्या विरोधात प्रथम खबरी अहवाल एफआयआर नोंदवून कारवाई करण्यात यावी, यामध्ये दूध भेसळ करणार्या व्यक्तीबरोबर दूध व दुग्धजन्य पदार्थ स्वीकारणार्या व्यक्ती अथवा आस्थापनेसही सहआरोपी करण्यात यावे, असे निश्चित झाले आहे. अशा समित्या राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांमध्ये गठीत करण्याचे आदेश असतानाही भेसळ शोधण्याची जबाबदारी दुग्ध विकास विभागाकडे ओढण्याची घाई दुग्ध विकास मंत्र्यांना झालीय याचा 'अर्थ' न कळण्याइतकी जनता 'दूधखुळी' नाही.सरकारने जाहीर केल्याप्रमाणे ३४ रुपये दुधाला दर देण्यास दूध कंपन्यांनी नकार दिला. सरकारने काढलेला दूध आदेश दर कंपन्यांनी धुडकावून लावल्याने या बैठकीत केवळ गुळगुळीत सारवासारव करण्यात आली. थोडक्यात काय, तर दूध उत्पादकांच्या लेखी सरकारच्या आदेशाची किंमत रद्दीसारखीच आहे. त्यामुळे २४ नोव्हेंबर रोजी राज्यभरातील दूध संकलन केंद्रांवर सरकारच्या आदेशाची होळी करण्याचे आवाहन दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आले आहे. अर्थात दूध उत्पादक संघ जरी दुधाच्या दरावर अडून असला तरीही दुधाच्या भेसळीकडे दुर्लक्ष करताच येणार नाही. वास्तविक, आरोग्याच्या दृष्टिकोनातून दूध कमालीचे उपयुक्त असते.

# डीपीडीसीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आमदार प्रविण पोटे पाटलांची आग्रही भुमिका

## पांदण रस्त्यांसाठी निधी तर तलाठी आंदोलनाचा काढला तोडगा



**दि२७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** सर्वसामान्य तसेच शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आग्रहाची तसेच न्यायाच्या भुमिकेतून कार्य करणारे आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी ना.चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी पार पडलेल्या जिल्हा नियोजनाच्या बैठकीत अनेक महत्वपूर्ण विषयांना हात घालत शेतकऱ्यांसाठी महत्वाच्या असलेल्या पांदण रस्त्यांसाठी निधी मंजूर करून घेतला आहे तसेच तलाठी आंदोलनावर तोडगा काढण्याच्या विषयात महत्वाची भुमिका घेऊन या आंदोलनामुळे शेतकऱ्यांची होणारी ससेहोलपट थांबविली आहे.

जिल्हा नियोजनाच्या निधीतून अमरावती शहर तसेच जिल्ह्यात अनेक महत्वपूर्ण कामे आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी प्रस्तावित केली होती. यामध्ये शेतकऱ्यांसाठी महत्वाच्या असलेल्या पांदण रस्त्यांच्या निर्मितीसाठी नियोजनाच्या बैठकीत सर्वांचे लक्ष वेधून घेत त्यासाठी निधी मंजूर करण्याची मागणी केली. यावेळी पालकमंत्री चंद्रकात पाटील यांनी आमदार पोटे यांच्या मागण्याकडे लक्ष देऊन त्यासाठी निधी मंजूर केला आहे. यावेळी आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी एमआरजीएस अंतर्गत विहिरींचे अनुदान शेतकऱ्यांना मिळत नसून ते पेंडिग असल्याची बाब प्रकर्षाने नमुद केली. यावर पालकमंत्री पाटील यांनी प्रशासनाला तातडीने सुचना करून शेतकऱ्यांच्या विहिरींचे अनुदान तातडीने काढण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या. सोबतच अमरावती शहरात जिल्हा स्त्री रूग्णालयात रूग्णांच्या नातेवाईकांची मोठी अडचण लक्षात घेऊन त्याठिकाणी त्यांच्या राहण्यासाठी एक निवास व्यवस्था अथवा डॉरमेटरी निर्माण करण्याची मागणी अनेक दिवसांपासून रेटून धरली होती. या मागणीला अन्य सर्वपक्षीय नेत्यांनी देखील संमती दिली. त्यामुळे ही मागणी देखील ना. चंद्रकात पाटील यांनी मंजूर केली आहे.

आंदोलनामुळे जिल्हाभरातील शेतकरी, विद्यार्थी यांची मोठी अडचणी सातबारा तसेच विविध दाखले मिळण्यासाठी होत होती. त्यामुळे तलाठ्यांचे हे आंदोलन सोडविण्यासाठी पुढाकार घेऊन आमदार पोटे यांनी जिल्हाभरातील शेतकऱ्यांना होणारी अडचण सोडविली आहे. पोलिस क्वॉर्टर मधील रस्ते अनेक दिवसांपासून नादुरूस्त असून त्यामुळे पोलिस कर्मचाऱ्यांना मोठी अडचण होत होती. त्यामुळे या रस्त्यांचे काम तातडीने व्हावे यासाठी आमदार पोटे यांनी प्रशासनाकडे मागणी केली होती. या मागणीकडे पुन्हा एकदा पालकमंत्र्यांचे लक्ष वेधून घेत आमदार पोटे पाटील यांनी पोलिस क्वॉर्टर मधील रस्त्यांचा प्रश्न देखील नियोजनाच्या बैठकीतून सोडवून घेतला आहे. यावेळी आमदार पोटे पाटील यांनी प्रशासनाकडून नागरिकांचे तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी केल्या जात असलेल्या दिरंगाईवर आक्रमक भुमिका घेऊन प्रशासनाला धारेवर धरले होते.

**खासगी जागेतून गेलेल्या लाईनची होणार शिफ्टिंग-** महावितरणकडून इलेक्ट्रिक सप्लाय करताना कोणाच्याही घरावरून खासगी जागेतून विद्युत तारा टाकल्या जातात. तसेच खासगी जागेत इलेक्ट्रिक पोल उभे केले जातात. यामुळे नागरिकांना अडचणींसोबत अनेकदा अपघात देखील होतात. हे टाळण्यासाठी अशा विद्युत तारा, पोल तसेच डीबींचे शिफ्टिंग करण्यासाठी जिल्हा नियोजनातून महावितरणसाठी विशेष निधीची तरतूद आमदार प्रवीण पोटे यांच्या मागणीनंतर मंजूर करण्यात आली आहे. योसबतच शेतकऱ्यांना वीजपुरवठा करणाऱ्या अनेक डीबी आणि ट्रान्सफार्मर हे नादुरूस्त असून ते देखील तातडीने बदलण्याची मागणी आमदार प्रवीण पोटे यांनी करत त्यासाठी निधी मंजूर करून घेतला आहे.

## मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम-२०२४

# नवमतदारांनी मतदार यादीत नाव नोंदवावे -जिल्हाधिकारी सौरभ कटियार



## विभागीय आयुक्तांकडून निवडणुक कामकाजांचा आढावा



**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,-** लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजाविणे आवश्यक आहे. त्यासाठी १७ व १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नव मतदारांनी मतदार यादीत त्यांच्या नावाची अवश्य नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी आज येथे केले. जिल्ह्यातील सर्व मतदानकेंद्रात मतदारांच्या नोंदणीसाठी आयोजित विशेष शिबीराचा सर्वांनी लाभ घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित विशेष नोंदणी शिबीराची जिल्हाधिकाऱ्यांनी आज पाहणी करुन विद्यार्थ्यांना संबोधित केले. त्यावेळी ते बोलत होते. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आशिष महल्ले, डॉ. पंजाबराव देशमुख प्रशिक्षण व विकास प्रबोधिनीचे संचालक तथा समन्वय अधिकारी अजय लहाने, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, उपजिल्हाधिकारी रणजित भोसले, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, तहसीलदार विजय लोखंडे यांच्यासह महाविद्यालयाचे विद्यार्थी- विद्यार्थीनी यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले की, आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाकडून मतदार यादी संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार नव मतदारांच्या नोंदणीसाठी २७ ऑक्टोबर ते ९ डिसेंबर दरम्यान विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत १ जानेवारी २०२४, १ एप्रिल २०२४, १ जुलै २०२४ तसेच १ ऑक्टोंबर २०२४ या अर्हता दिनांकास १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नव मतदारांनी, विद्यार्थ्यांनी मतदार यादीत त्यांच्या नावाची नोंदणी करावी. तसेच जे मतदार इतर मतदार संघात स्थांनातरित झाले आहे किंवा इतर मतदार संघातून या ठिकाणी आले आहेत, अशांचा शोध घेऊन मतदार यादींचे नुतणीकरण करण्यात येणार आहे.

त्यासाठी जिल्ह्यातील सर्व मतदारांनी आपले नाव मतदार यादीत आहे किंवा नाही याची तपासणी करावी. काही सुधारणा करावयाची असेल तसे संबंधित मतदान केंद्राधिकारी यांना कळवावे, असेही श्री. कटियार यांनी यावेळी सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, मतदार नोंदणीसाठी जिल्हा प्रशासनाव्दारे विविध उपक्रमांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत असून विशेष शिबिरांचेही आयोजन करण्यात येत आहे. त्याचा नागरिकांनी लाभ घेऊन आपले नाव मतदार यादीत नोंदवावे.

भारत निवडणूक आयोगाव्दारे मतदार नोंदणी व मतदार कार्ड मिळण्यासाठी ऑनलाईन सुविधाही उपलब्ध करुन दिली आहे. त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा. नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी नमूना ६, नमूना ७ ग्राम, तालुका व जिल्हास्तरावरील सर्व मतदान केंद्रावर व महसूल विभागाच्या निवडणूक शाखेत उपलब्ध करुन देण्यात आला आहे, असे श्री. कटियार यांनी सांगितले.

महाविद्यालयीन विद्यार्थी- विद्यार्थीनींनी मतदानाचे महत्व इतरांना पटवून देत मतदार नोंदणीसाठी जनजागृती करावी. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात 'मतदार जनजागृती क्लब'ची स्थापना करावी. 'मतदार जनजागृती मित्र' म्हणून याविषयी इतरांना मार्गदर्शन करावे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या सादरीकरणातून मतदानाच्या जनजागृतीसाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले.

### विभागीय आयुक्तांकडून निवडणूक कामकाजाचा आढावा व मतदान केंद्रास भेट

तत्पूर्वी मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत झालेले कामकाज, स्वीप मोहिम, तालुकानिहाय मतदारांची संख्या, मतदान केंद्रे, मतदान जागृती आदीबाबत आढावा घेतला. जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून उपरोक्त बाबींची माहिती दिली.त्यानंतर डॉ. पाण्डेय यांनी बडनेरा मतदार संघातील सामरा हायस्कुल येथील मतदान केंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. तसेच मतदार नोंदणी, मतदान जनजागृतीबाबत आवश्यक सूचना दिल्या.




## जास्त प्रमाणात अँटिबायोटिक्स घेतल्याने शरीरावर दुष्परिणाम होतात?

**दि. २७ विदर्भ प्रजासत्ताक -** अँटीबायोटिक जागरूकता आठवडा सध्या जगभरात सुरू आहे. हा आठवडा अमेरिकेसह इतर अनेक देशांमध्ये पाळला जातो. अँटिबायोटिक्स ही अशी औषधे आहेत जी डॉक्टर जीवाणूंच्या संसर्गावर उपचार करण्यासाठी देतात. ही औषधे शरीरात वाढणाऱ्या बॅक्टेरियाला मारून त्यांची वाढ आणि प्रसार थांबविण्याचं काम करतात.

**जागतिक प्रतिजैविक जागरूकता आठवडा-** अमेरिकेसह जगभरात अँटीबायोटिक जनजागृती आठवडा सुरू आहे. यावर्षी हा आठवडा 'प्रिव्हेंटिंग अँटीमायक्रोबियल रेझिस्टन्स टुगेदर' या थीमवर पाळला जातोय. हा आठवडा साजरा करण्यामागचा उद्देश अँटीबायोटिक प्रतिरोधक आव्हानाला सामोरं जाणं हा आहे. अँटीबायोटिक्सच्या प्रती असलेला समज वाढवणे आणि त्याचा प्रसार करणे हा या आठवड्याचा मुख्य उद्देश आहे.

**अँटीबायोटिक म्हणजे काय?**

बॅक्टेरियामुळे होणाऱ्या आजारांवर उपचार करण्यासाठी अँटिबायोटिक्स दिले जातात. अँटिबायोटिक्स सर्दी, ताप आणि खोकला यांसारख्या विषाणूजन्य संसर्गांवर उपचार करण्यासाठी तसेच मोठ्या आजारांवर मात करण्यासाठी वापरले जातात. अँटीबायोटिक्सचे काम जीवाणू नष्ट करण्याचं आहे. कधीकधी धोकादायक जीवाणू शरीरात खूप जास्त होतात. अशा वेळी अँटीबायोटिकचा वापर केला जातो.

अँटीबायोटिक कसे कार्य करतात?

प्रतिजैविक: पेनिसिलिन सारखे




जीवाणूविरोधी अँटीबायोटिक जीवाणू मारण्याचे काम करतात. ही औषधे सामान्यत: जिवाणूंच्या सेल सामग्रीच्या निर्मितीमध्ये हस्तक्षेप करून कार्य करतात. बॅक्टेरियोस्टॅटिक बॅक्टेरियाची वाढ थांबवते. पहिला डोस घेतल्यानंतर लोकांना बरे वाटण्यास याचं सेवन बंद केलं जातं.

**अँटीबायोटिक कसे घ्यावे?-** बहुतेक लोक अँटीबायोटिक गोळ्या घेतात. काही डॉक्टर त्यांना इंजेक्शनद्वारे देखील देऊ शकतात. बहुतेक अँटीबायोटिक्स काही तासांतच काम करू लागतात. अनेक वेळा डॉक्टर पेशंटला औषधांचा संपूर्ण कोर्स घेण्याचा सल्ला देतात जेणेकरून जीवाणू पुन्हा निर्माण होऊ नयेत.

**स्वतः अँटीबायोटिक्स घेऊ नका, ते धोकादायक ठरू शकते-** थक्ज च्या म्हणण्यानुसार, कोणाच्याही सल्ल्यानुसार स्वतः अँटीबायोटिक्स घेतल्याने शरीराला नुकसान होते. प्रतिजैविकांच्या प्रतिकारामुळे संसर्ग होऊ शकतो. यासाठी रुग्णाला दीर्घकाळ रुग्णालयात राहून उपचार घ्यावे लागतात. जर परिस्थिती अधिक गंभीर झाली तर रुग्णाचा मृत्यूही होऊ शकतो. प्रतिजैविक प्रतिरोधक संसर्ग कोणत्याही वयाच्या व्यक्तीस होऊ शकतो.

# बोंडेंवर दगडफेक; येवद्यात तीव्र पडसाद

## भाजपाची पोलिसात तक्रार : हल्लेखोरांवर कार्यवाहीची मागणी



**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक दर्यापुर :** राज्यसभा खासदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल बोंडे यांच्यावर तिवसा येथे अज्ञात हल्लेखोरांनी दगड फेक केल्याची घटना घडल्यानंतर त्याचे तीव्र पडसाद उमटण्यास सुरुवात झाली असून तालुक्यातील येवदा येथील भाजपच्या कार्यकर्त्यांनी जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य नकुल सोनटक्के यांच्या नेतृत्वात या संदर्भात येवदा पोलिसात तक्रार दाखल करून हल्येखोरांवर कार्यवाही करण्याची मागणी उपस्थित केली आहे.

तसेच या घटनेचा निषेधही भाजपने नोंदविला आहे.भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे हे २५ नोव्हेंबरला तिवसा येथे शंकरपाटाच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी गेले होते. त्यावेळी अज्ञातांनी दगडफेक केली. यामध्ये डॉ. अनिल बोंडे हे किरकोळ जखमी झाले आहेत. त्यानंतर भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यकारणीचे सदस्य नकुल सोनटक्के यांनी आक्रमक होत या भ्याड हल्ल्याचा निषेध नोंदवला आहे. अशा पद्धतीने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करून परिस्थिती बिघडवण्याचा प्रयत्न होणे हे अत्यंत चुकीचे आहे. मागे हल्ले केल्यापेक्षा समोर या भाजपही त्याला जशास तसे उत्तर देईल असा इशारा त्यांनी दिला आहे. त्यांच्या नेतृत्वात भाजपच्या कार्यकर्त्यांनी येवदा पोलिसात धाव घेत दुय्यम ठाणेदार वसंत शिंदे यांच्याकडे तक्रार दाखल केली. तसेच हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही भाजपने केली आहे. यावेळी, भाजपा जिल्हा कार्यकारणी सदस्य नकुल सोनटक्के,भाजपा युवा मोर्चा जिल्हा कार्यकारणी पंकज कान्हेरकर, ऋतिक गावंडे, येवदा येथील युवा मोर्चा शाखा प्रमुख मयूर वांदे, वडनेर गंगाई युवा मोर्चा शाखाप्रमुख कुलदीप पाटील हागे, सागर हरसुले,गणेश श्रीनाथ, विकास गुप्ता,श्रवल गणगणे,आदेश इखे,प्रज्वल गावंडे,चेतन रोकडे, मनोज चव्हाण, हर्षल बिजवार,ज्ञानेश्वर दळवी, विशाल गायगोले, राम अग्रहारी, आर्यन माकोडे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी मोठ्यासंख्येने उपस्थीत होते.

दै.विदर्भ प्रजासत्ताक अंक नि:शुल्क पाहिजे असल्यास आम्हाला तुमच्या नावासह टेक्स मेसेज किंवा व्हाट्सअप करा आमचा मो.नंबर ८६२४९८५६३३ संपर्क करा.

## खासदार सौ नवनीत रवी राणा यांच्या मागणीला यश

# बेलोरा विमानतळ येथे होणार पायलट प्रशिक्षण केंद्र

### केंद्रीय उड्डयन मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी दिली मान्यता

**दि२७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – जिल्ह्याच्या लोकप्रिय खासदार सौ नवनीत रवी राणा यांनी अमरावती जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्याचा विडा उचलला असून जिल्ह्यात औद्योगिक विकास होवून जिल्ह्यातील तरुण तरुणींना रोजगाराच्या चांगल्या संधी निर्माण व्हाव्यात यासाठी बेलोरा विमानतळावर पायलट ट्रेनिग स्कूल व्हावी अशी मागणी खासदार सौ नवनीत रवी राणा यांनी केली होती याच अनुषंगाने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी ने निविदा प्रक्रिया सुरू केली असून प्रशिक्षणासाठी इच्छुक असणाऱ्या कंपनी संस्था आदिंकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत,सर्व अटी शर्ती ची पूर्तता करणाऱ्या संस्था कंपनी ची नेमणूक करून प्रशिक्षणार्थी व हौशी पायलट साठी चांगल्या ट्रेनिंग ची सुविधा उपलब्ध होणार आहे व अमरावती जिल्ह्यात आता वैमानिक तयार होतील असा विश्वास खासदार सौ नवनीत रवी राणा यांनी व्यक्त केला आहे.महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरण तर्फे यासंदर्भात निविदा जारी,लवकरच अमरावती बेलोरा येथे होत असून पायलट ट्रेनिंग स्कूल ची स्थापना होणार आहे.




खासदार सौ नवनीत रवी राणा यांनी अमरावती जिल्हावासियाना ही अनमोल भेट दिल्याबद्दल जिल्ह्यातील युवक आणि नागरिकांनी आनंद व्यक्त केला असून खासदार सौ नवनीत रवी राणा यांचे आभार मानले आहे.

## उद्यापासून वीज वितरण कर्मचाऱ्यांचे असहकार आंदोलन

### वीज लाईन स्टाफ बचाव कृती समितीचा एल्गार



**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – महावितरणचा मुख्य कणा समजल्या जाणाऱ्या वीज लाईन स्टाफ वर वरिष्ठांकडून होत असलेला दबावतंत्राचा वापर तसेच अन्यायकारक वृत्ती यामुळे वीज लाईन स्टाफ ने याविरोधात बंड पुकारले असून उद्या दि.२८ नोव्हेंबर पासून तर ३० नोव्हेंबर पर्यंत जिल्ह्यातील सर्व वीज लाईन स्टाफ कर्मचारी असहकार आंदोलन करून विरोधाचा सामना करणार आहे.

धुळे येथे झालेल्या वीज लाईन स्टाफ कर्मचाऱ्यांच्या मेळाव्यात राज्यातील विविध संघटना एकत्र येऊन वरिष्ठांच्या अन्यायकारक धोरणाविरोधात जोमाने एकवटले आहेत.वीज लाईन स्टाफ कर्मचारी यांनी ऑक्टोबर महिन्यापासून आंदोलनात्मक पवित्रा घेतलेला असून ३० ऑक्टोबर रोजी महावितरणने दिलेले सिम कार्ड सुद्धा परत करण्यात आले.६ नोव्हेंबर पासून वाहनांना काळे झेंडे लावून सेवेत महावितरणच्या दडपशाहीचा विरोध सुरू केला असून वरिष्ठ अधिकारी कर्मचाऱ्यांना वसुली साठी तगादा लावत आहेत तसेच कार्यवाही करण्याच्या नोटीस बजावत आहे त्यामुळे संतप्त कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांना निवेदन देऊन सहकार्याची आणि न्यायाची अपेक्षा केली आहे.

वरिष्ठांनी लाईन वीज स्टाफ कर्मचार्यांवर कोणतीही कार्यवाही करू नये किंवा दबावतंत्राचा वापर करू नये अन्यथा कोणत्याही क्षणी कर्मचारी वर्ग धरणे आंदोलन करतील असा इशारा महाराष्ट्र राज्य वीज लाईन स्टाफ बचाव कृती समितीच्या वतीने मुख्य अभियंता महावितरण परिमंडळ यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

## पवित्र संविधानाचे संरक्षण आणि जागृती होणे आवश्यकआमदार- ॲड. यशोमती ठाकूर

**दि२७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – पवित्र संविधान हे लोकशाहीचा आत्मा आहे. संविधानामुळेच अनेकांना न्याय मिळाला आहे. परंतु सध्या दुदैवाने पवित्र संविधानाची तोडफोड करण्याचे प्रकार सध्या होताहेत. हे चूकीचं असून पवित्र संविधानाचे संरक्षण आणि जागृती होणे अतिशय गरजेचे आहे असे मत आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केले. आज २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनाचे औचित्य साधून काँग्रेस पक्षाच्या वतीने संविधान जागृती रॅली काढण्यात आली. त्यावेळी त्या बोलत होत्या. त्या पुढं बोलतांना म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख हे खरे समाजसुधारक होते. त्यांनी कोणती अपेक्षा न ठेवता आपल सर्वस्व देशासाठी अर्पण केलं. डॉ. पंजाबराव देशमुख यांची कर्मभूमी ही अमरावतीच आहे. त्यांच शैक्षणिक क्षेत्रातल कार्य उत्तुंग आहे. त्यामुळे या समाजसुधारकांनी समाजाला ही दिशा दिली आहे, त्याची कास धरावी लागेल, असही त्या यावेळी बोलतांना म्हणाल्या. काँग्रेस पक्षाच्या वतीने शहरात संविधान जागृती रॅली काढण्यात आली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन रॅली काढण्यात आली. यावेळी आमदार बळवंत वानखडे, माजी मंत्री डॉ. सुनिल देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलींद चिमोटे, किशोर बोरकर, भैय्या पवार, काँग्रेसच्या अनुसूचित जमातीची जिल्हाध्यक्ष प्रविण मनोहर, अमरावती जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष पंकज मोरे, जिल्हा ग्राहक मंचचे सदस्य समिर जवंजाळ, शैलेश काळबांडे, डॉ. अंजली ठाकरे, डॉ. वर्षा देशमुख, एनएसीयुआयचे अध्यक्ष वैभव देशमुख यांच्यासह शहर काँग्रेसचे व जिल्हा काँग्रेसचे असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.



## स्व. डॉ. दिलीप मालखेडे यांच्या जीवनचरित्रावर आधारित पुस्तकाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते विमोचन



**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु स्व. डॉ. दिलीप मालखेडे यांच्या जीवनचरित्रावर आधारित 'ध्येयवेडा कुलगुरु' या पुस्तकाचे विमोचन उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या हस्ते आज करण्यात आले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या डॉ. के.जी. देशमुख सभागृह येथे 'ध्येयवेडा कुलगुरु' या पुस्तकाचा विमोचन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे पाटील, आमदार प्रताप अडसड तसेच विद्यापीठाचे कुलसचिव तुषार देशमुख, स्व. डॉ. दिलीप मालखेडे यांच्या पत्नी श्रीमती दिपाली मालखेडे, 'ध्येयवेडा कुलगुरु' या पुस्तकाचे लेखक डॉ. मनीष गवई, दिनेश सुर्यवंशी तसेच विद्यापीठाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

पुस्तकाच्या विमोचन प्रसंगी पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले की, कुलगुरु डॉ. दिलीप मालखेडे हे विद्यार्थी केंद्री धोरण राबविणारे कुलगुरु तसेच उत्कृष्ट प्रशासक होते. विद्यापीठामध्ये काम करताना अल्पावधीत विद्यार्थ्यांमध्ये ते लोकप्रिय बनले. त्यांच्या काम करण्याच्या शैलीमुळे प्राध्यापकांसह विद्यार्थीही प्रभावित झाले होते. त्यांच्या अकाली जाण्यामुळे एक अभ्यासू, दूरदृष्टी असणारा मार्गदर्शक तसेच शिस्तप्रिय व्यक्ती हरपला. त्यांनी केलेले कार्य पुढील पिढीला मार्गदशक ठरावे यासाठी त्यांच्या आयुष्यावर आधारित 'ध्येयवेडा कुलगुरु' या पुस्तकामध्ये स्मृती स्वरुपात जतन करण्यात आले आहे. या पुस्तकांच्या रुपाने त्यांचे कार्य सदैव स्मरणात राहील, असेही ते यावेळी म्हणाले.

पुस्तकाचे लेखक डॉ. मनीष गवई यांनी यावेळी 'ध्येयवेडा कुलगुरु' या पुस्तकाची पार्श्वभूमी सांगितली. स्व. डॉ. दिलीप मालखेडे यांच्या पत्नी श्रीमती दिपाली मालखेडे यांनी यावेळी त्यांच्या सहवासात घालविलेल्या स्मृतींना उजाळा दिला.

## लोकसभेसाठी ठाकरे गटाची तयारी,

# १० नेत्यांवर सोपवली मोठी जबाबदारी

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई** – आगामी लोकसभा, विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने जोरदार तयारी सुरु केली आहे. भाजपसह शिंदे गटाला शह देण्यासाठी ठाकरे गटाने संघटनात्मक बांधणी केली आहे.

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रातील संघटनात्मक बांधणीवर भर देण्यासाठी विभागीय नेत्यांची यादी जाहीर केली आहे. या १० नेत्यांवर वेगवेगळ्या विभागांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र ,कोकण, मराठवाडा, पश्चिम आणि पूर्व विदर्भाची जबाबदारी दहा नेत्यांवर सोपविण्यात आली आहे. यामध्ये खासदार संजय राऊत, अनिल देसाई, राजन विचारे, अनंत गीते, चंद्रकांत खैरे, सुनील प्रभू, भास्कर जाधव, विनायक राऊत यांच्यासह आमदार रवींद्र वायकर यांच्या नावाचा समावेश आहे. या सर्व नेत्यांवर वेगवेगळ्या विभागाची संघटनात्मक जबाबदारी सोपवण्यात आली आहे.



संजय राऊत यांच्यावर उत्तर महाराष्ट्रासह, नगर, शिर्डी, पुणे, मावळची जबाबदारी देण्यात आली आहे.

तर अरविंद सावंत पश्चिम विदर्भ, तर भास्कर जाधव यांच्याकडे पूर्व विदर्भाची जबाबदारी सोपवण्यात आली. दरम्यान, आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी जानेवारीत शिवसेना ठाकरे गटाकडून राज्यव्यापी शिबिर घेतले जाणार आहे. तसेच, जानेवारी महिन्यात उद्धव ठाकरे महाराष्ट्र दौरा करणार आहे. उद्धव ठाकरे यांच्या महाराष्ट्र दौरा आणि जाहीर सभांचे नियोजन सुद्धा लवकर जाहीर केले जाणार आहे.

### कोणत्या नेत्याकडे कोणती जबाबदारी?

– खासदार संजय राऊत यांच्याकडे लोकसभा मतदारसंघ नाशिक, दिंडोरी, जळगाव, रावेर, धुळे, नंदुरबार, नगर, शिर्डी, पुणे, बारामती, शिरूर, मावळ (विधानसभा पिंपरी चिंचवड, मावळ) मतदारसंघांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

## राजकीय मेळ्यातील संवादासाठी सरकारी यंत्रणा सज्ज; जुनाट व्यवस्थेला फाटा, नव्या व्यवस्थेची कास

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक मुंबई** –डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून पुढे दोन आठवड्यांसाठी भरणाऱ्या राजकीय मेळ्यातील 'संवाद' सुस्पष्ट राहावा, यासाठी सरकारी यंत्रणा सज्ज झाली आहे. या पार्श्वभूमीवर, पारंपारिक आणि जुनाट व्यवस्थेला फाटा देण्यात आला असून, नव्या व्यवस्थेची कास धरण्यात आली आहे.

राजकीय स्थितीच्या अनुषंगाने सध्या राज्यातील राजकीय 'संवाद बिघडला' असून तो 'वारंवार वादाचे रूप' धारण करीत आहे. परिणामी सध्या थंडीच्या दिवसात राज्यातील राजकीय तापमान वाढल्याचे भासत आहे. या पार्श्वभूमीवर, उपराजधानीत ७ डिसेंबरपासून हिवाळी अधिवेशनाला सुरूवात होणार आहे. 'राजकीय मेळा' म्हणूनही काही जण अधिवेशनाकडे बघत असतात. अधिवेशनाच्या वेळी सभागृहाच्या आत आणि बाहेर एकमेकांवर आरोप – प्रत्यारोप होत असतात. सवाल – जवाब आणि आरोप–प्रत्यारोपाच्या फैरी नेत्यांकडून डागल्या जात असल्या तरी अधिवेशनाच्या कामकाजाच्या संबंधाने येथे येणाऱ्या प्रत्येक पक्षाच्या प्रत्येक नेत्यांचा संवाद निट व्हावा, त्यांना बोलण्या–



ऐकण्यात कसलीही अडचण होऊ नये, सारेच सुस्पष्ट व्हावे, यासाठी भारत संचार निगम लिमिटेड अर्थात बीएसएनएल गेल्या काही दिवसांपासून चांगलेच परिश्रम घेत आहे.आज अपवाद वगळता आत–बाहेर सर्वच जण मोबाईलचा वापर करीत असले तरी मंत्रालय, सचिवालय, विविध मंत्र्यांची दालनात लॅण्डलाईनच (टेलिफोन) असतो. त्याच्याच आधारे सरकारी यंत्रणांचा अंतर्गत संवाद, कागदोपत्री आदेश, अधिसूचना देवाणघेवाणीची आणि प्रसारणाची प्रक्रिया पार पाडली जाते.यंदाच्या हिवाळी अधिवेशनात या प्रक्रियेत कसलाही व्यत्यय नको म्हणून बीएसएनएलचे अधिकारी कर्मचारी परिश्रम घेत आहेत. त्यांच्या माहितीनुसार, यंदा मंत्रालय, सचिवालय, विविध मंत्र्यांची दालनं, पार्टी कार्यालये आदी ठिकाणी ३८९ टेलिफोन लावले जाणार आहेत. त्यासाठी जुन्या ११२ कॉपर लाईन काढून संवाद अधिक स्पष्ट करणाऱ्या १४५ नव्या फायबर टू द होम (एफटीटीएच) लाईन जोडण्यात आल्या आहेत. जुन्या कॉपर लाईनच्या तुलनेत एफटीटीएचमुळे इंटरनेट सुविधा ३० ते ३०० एमबीपीएस फास्ट करता येते.

### सिटिंग अरेजमेंटची अपेक्षा

फायबर लाईनचे काम जवळपास पूर्ण झाले असून, विधानसभा–परिषदेत सिटिंग अरेंजमेंट झाली की लगेच मोडेम आणि टेलिफोन कनेक्शन जोडले जाणार असल्याचे संबंधितांनी सांगितले आहे.

## सशक्त लोकशाहीसाठी संविधान अंगीकारणे आवश्यक- आ. प्रवीण पोटे

### भाजपतर्फे संविधान दिन साजरा, प्रास्ताविकेचे वाचन



**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** संपूर्ण जगभरातील सर्वात मोठी लोकशाही असलेला भारत देश हा जगातील सर्वात मोठे लिखित संविधान असलेल्या भारतीय संविधानावर चालतो. भारतीय संविधान हा लोकशाहीचा मजबूत पाया असून त्यामुळेच देशातील प्रत्येक नागरिकांचे हक्क आणि अधिकार सुरक्षित आहेत. भारतीय लोकशाहीला आणखी सशक्त करण्यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकाने भारतीय संविधानाला समजून घेत ते अंगीकारणे आवश्यक असल्याचे मत भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष आ. प्रवीण पोटे पाटील यांनी केले आहे. इर्विन चौक येथील आ. प्रवीण पोटे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात भारतीय जनता पक्षाच्या वतीने संविधान दिन आज मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला आ. प्रवीण पोटे यांच्यासह भाजपचे नेते जयंत डेहनकर, सिद्धार्थ वानखडे, सतिष करेसिया, धनराज चक्रे, गंगा खारकर, कौशिक अग्रवाल आदी मान्यवरांची उपस्थिती होती. सर्वप्रथम भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून आ. प्रवीण पोटे पाटील यांनी केले. तसेच संविधानाच्या प्रास्ताविकेचे सार्वत्रिक वाचन करून भारतीय संविधान अंगीकृत करण्याची शपथ उपस्थितांनी घेतली. यावेळी मार्गदर्शन करताना आ. पोटे पुढे म्हणाले की, आजच्याच दिवशी भारतीय संविधान पूर्ण होऊन ते स्वीकृत करण्यात आले होते. हा देशच नव्हे तर जगाच्या इतिहासातील एक महत्वाचा दिवस होता. २६ जानेवारी १९५० पासून हे संविधान देशात लागू झाले आणि देश जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून नावरूपास आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि घटना समितीतील सर्व सदस्यांचे योगदान हे न विसरण्यासारखे आहे. त्यामुळे त्यांच्या योगदानाची आठवण करित आपण सर्वांनी भारतीय संविधानातील तरतूदींचा अभ्यास करून स्वत:ला नागरिक म्हणून सशक्त बनविण्यासाठी सजग होऊया असा संदेश आ. पोटे यांनी यावेळी बोलताना दिला. या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाच्या सर्व सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते, परिसरातील नागरिक तसेच गणमान्य मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# गावाच्या विकासासाठी मतभेद दुर करुन सर्वांनी एकत्र यावे- आमदार ॲड. यशोमती ठाकूर

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी –** विकासकामे जलदगतिने पुर्ण व्हावीत यासाठी सर्वांनी आपसातील मतभेद दुर सारुन एकजुट होवून त्याचा पाठपुरावा करावा. तसेच विकासकामे मंजूर करणे व त्यासाठी निधी खेचून आणणे हे वाटते तितके सोपे नसते. तर सध्याच्या सरकारने महाविकास आघाडी सरकारच्या काळात मंजूर झालेल्या विकास कामांना स्थगनादेश दिला होता. त्यासाठी न्यायालयात लढा लढावा लागला. त्यावरुन सध्याचे सरकार विकासकामात कसा खोडा घालतात, पक्षपात करतात हे स्पष्ट झालं आहे. अशी टिका आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी सरकारवर केली. यावेळी व्यासपीठावर आमदार बळवंत वानखडे, मोर्शी तालुका काँग्रेस कमेटिचे अध्यक्ष रमेश काळे आदी उपस्थित होते. त्या मोर्शी तालुक्यातील धामणगांव-पोरगव्हाण-विष्णोरा रस्त्यावरील पुलाच्या बांधकामाचे भुमिपुजन प्रसंगी बोलत होत्या. त्या पुढ म्हणाल्या की, विकासकामे करणे हे माझे कर्तव्यच आहे. मी कुणावर उपकार केले अस अजिबात नाही. परंतु विकासकामे करतांना किती मनस्ताप सहन करावा लागतो याची किमान सर्वांनी जाणिव ठेवावी. अस सांगून त्या म्हणाल्या की, सध्या राज्यात असलेलं सरकार विकासनिधी वाटपात मोठ्या प्रमाणात पक्षपात करताहेत. मतदारसंघ कुणाचा त्यावरुन निधी वाटप केल्या जातो. ते राजकारण करतात, पण आम्ही मात्र विकासकामे कशी मार्गी लागतील यासाठी सातत्याने प्रयत्न करतो.





पुरोगामी महाराष्ट्रात विकास कामात राजकारण आणि निधी वाटपात उघडपणे पक्षपात हे योग्य नाही. राज्यात ही स्थिती असली तरी देशातही यापेक्षा वेगळे चित्र नाही. महिला शक्तीचा आदर करणे ही आपली संस्कृती आहे, परंतु मनिपुर सारख राज्य हिंसाचारात होरपळून निघत असतांना व तिथे एका कारगील सैनिकाच्या पत्नीला निर्वस्त्र करुन तिची धिंड काढून संपूर्ण नारीशक्तीचा घोर विटंबना झाली असतांना पंतप्रधान नरेंद्र मोदी हे त्या अभागी, दुदैवी महिलेला भेटत सुद्धा नाही. ही माणूसकी आहे का? असा सवाल करुन त्या म्हणाल्या की, पवित्र संविधान हे लोकशाहीचा आत्मा आहे. मात्र याच पवित्र संविधानाची तोडफोड करुन लोकशाहीच्या आत्म्यावरच घाला घालण्याचे पातक ही मंडळी करताहेत. या सर्व बाबींचा विचार सर्वसामान्य जनतेने करावा. सरकारचा विकास म्हणजे केवळ आभास असल्याचेही त्या म्हणाल्या. यावेळी प्रविण काळमेघ, बाळासाहेब पुंड, सरपंच अक्षय तायवाडे, गिरीधर काळमेघ, माया बोकणे, इंद्रिस पटेल, प्रभाकर कडू, हेमंत सोलव, स्वाती सौदागर, मयुर सोलव, श्रीमती बोडाखे, दिनेश पुंड, कविता पुंड, मनोज टेकाडे, गजानन ठवळी, श्रीमती कोकणे आदी मान्यवर उपस्थित होते.

# १.७३ कोटी दस्तऐवजात कुणबी जातीच्या २० लाख नोंदी

## ३ यंत्रणांद्वारा तपासणी : कुणबी-मराठा, मराठा-कुणबी अशी एकही नोंद नाही

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :-** मराठा आरक्षणाचा अनुषंगाने कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये जुने पुरावे आवश्यक आहेत. यासाठी पश्चिम विदर्भात शासनाच्या १३ यंत्रणांद्वारा तब्बल १,७२,४६,८९५ कागदपत्रांची आतापर्यंत पाहणी करण्यात आली. यामध्ये कुणबी जातीच्या २०,०६,४१३ नोंदी आढळून आल्या आहेत. याशिवाय कुणबी-मराठा, मराठा-कुणबी अशी एकही नोंद आढळली नसल्याचे प्रशासनाने सांगितले. कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपद्धती विहित करण्यासाठी गठित समितीचे अध्यक्ष निवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे व समितीच्या सदस्यांद्वारा येथील विभागीय आयुक्त कार्यालयात पाचही जिल्ह्यांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये ही माहिती समोर आलेली आहे.

समितीने दोन प्रकारच्या नमुन्यात माहिती मागितलेली आहे. यामध्ये सन १९४८ पूर्वीचे व सन १९६७ पूर्वीच्या नोंदींचा यामध्ये समावेश आहे. याशिवाय काही जुन्या नोंदी मोडी लिपीमध्ये आहेत.




त्याचीदेखील पडताळणी तज्ज्ञांद्वारा केली जात आहे. शासकीय विभागाकडे विशेषत: महसूल विभागाकडे असलेल्या अभिलेख्यांममधील मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीच्या नोंदीची तपासणी अमरावती विभागात सध्या सुरू आहे.

### तपासलेले अभिलेखे, कुणबी जातीच्या नोंदी

| जिल्हा | तपासलेल्या नोंदी | कुणबी जातीच्या नोंदी |
|---|---|---|
| अकोला | २८,११,३४९ | ३,७२,८८४ |
| अमरावती | २८,३६,३३२ | ४,७७,८५४ |
| बुलडाणा | ४८,८५,५७० | ४,८१,१२५ |
| वाशिम | २३,११,६१९ | २,०५,६८७ |
| यवतमाळ | ४४,०२,०३५ | ४,६८,८६३ |
| एकूण | १,७२,४६,८९५ | २०,०६,४१३ |

### पुरावे तपासणीसाठी दोन कालखंडात विभागणी

कुणवी जातीचे पुरावे तपासणीसाठी दोन कालखंडातील अभिलेख्यांची तपासणी करण्यात येत आहे. यामध्ये सन १९४८ ते १९६७ या कालावधीतील ९६,९८,३२० नोंदी तपासण्यात आल्यात. यामध्ये कुणबी जातीच्या ९,४१,३२६ नोंदी आढळल्या. याशिवाय सन १९४८ च्या पूर्वीच्या कालावधीतील ७५,४८,५७५ नोंदी तपासण्यात आल्या. यामध्ये कुणबी जातीच्या २०,०६,४१३ नोंदी सापडल्याचे समिती सदस्यांनी सांगितले.

# कौशल्य, शरीर आणि बुद्धी यांच्या एकत्र प्रभावी क्षमतेमुळेच विजेतपद साकारणे शक्य -आमदार सौ. खोडके

## स्पर्धेत राज्यभरातून ६५० खेळाडूंचा सहभाग

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** यंदा अमरावती येथे प्रथमच होत असलेल्या दुसरी राज्यस्तरीय खेलो मास्टर्स क्रीडा स्पर्धा २०२३ मधून खेळाडूंना आपले अंगीभूत कौशल्य दाखविण्याची संधी मिळाली आहे. खेळाडूंचा उत्साह वाढविणारी ही स्पर्धा आहे.उच्च कौशल्याच्या जोरावरच; तसेच त्यांच्या उच्च तंदुरुस्तीच्या जोरावर सर्वोच्च खेळासाठी आवश्यक असणारी दीर्घकालीन एकाग्रता साध्य करीत कठोर मेहनतीच्या बळावर या स्पर्धेत सहभागी झालेले खेळाडू लक्षवेधी कामगिरीतून आपल्या खेळाचे प्रदर्शन करीत आहे. कुठलेही दडपण न घेता नैसर्गिक कामगिरीवर भर देऊन सर्वश्रेष्ठ कामगिरी आणि स्वप्नपूर्ती करिता जिद्द,चिकाटी व अविश्रांत परिश्रमातून मिळविलेले क्रीडा क्षेत्रातील यश हे होतकरू व नवोदित खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरू पाहत आहे.आपली क्षमता व गुणवत्ता सिद्ध करीत दर्जेदार खेळीतून सहभागी स्पर्धक आपली छाप पाडत आहे.वर्षानुवर्षे ही कामगिरी करताना अनेक तास केलेल्या सरावामुळे कौशल्य,शरीर आणि बुद्धी यांच्या एकत्र प्रभावी क्षमतेमुळेच विजेतपद साकारणे शक्य आहे. प्रत्येक विजेता व यशस्वी खेळाडूंचे सातत्य हे त्याच्या कामगिरीचे वैशिष्ट्य आहे. आपल्या दैदीप्यमान कामगिरीतून छाप पाडीत या स्पर्धेत आपल्या लौकिकास साजेसा खेळाचे प्रदर्शन करणाऱ्या सर्व खेळाडूंचे आपण अमरावती येथे स्वागत करतो,तसेच त्यांच्या आगामी उज्वल कामगिरी करिता सुयश चिंतिते. असे प्रतिपादन आमदार-



सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५ व्या जयंती महोत्सवा निमित्त आयोजित राज्यस्तरीय दुसरी खेलो मास्टर्स क्रीडा स्पर्धा २०२३ प्रसंगी उपस्थितांना संबोधून केले. रविवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२३ रोजी खेलो मास्टर्स गेम्स असोसिएशन,महाराष्ट्र संलग्नित अमरावती डिस्ट्रिक्ट खेलो मास्टर्स गेम्स असोसिएशन आणि श्री शिवाजी शिक्षण संस्था यांच्या सहकार्याने डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५ व्या जयंती महोत्सवा निमित्त आयोजित राज्यस्तरीय दुसरी खेलो मास्टर्स क्रीडा स्पर्धा २०२३ च्या प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून त्या बोलत होत्या. या स्पर्धेत ३० ते १०० वर्ष विविध वयोगटातील पुरुष व महिलांकरिता विविध क्रीडा स्पर्धांचे पंचवटी चौक,अमरावती स्थित श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय,विभागीय क्रीडा संकुल,अमरावती, श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या भव्य मैदानावर आयोजित या स्पर्धेत संपूर्ण राज्यभरातून ६५० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला आहे.३० ते १०० वर्ष विविध वयोगटातील पुरुष व महिलांकरिता विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये कुस्ती,रायफल शूटिंग,हौकी, फुटबॉल, शूटिंग बौल,खो-खो,टेबल टेनिस, जलतरण,कबड्डी,मैदानी स्पर्धा,बॅडमिंटन, व्हालीबॉल, बास्केटबॉल, आर्चरी, नेटबाल, आदी खेळांचा समावेश आहे.

यावेळी आयोजन समितीच्या वतीने आमदार सौ. सुलभाताई खोडके यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यादरम्यान पुणे येथील धनकवडी स्थित रहिवासी वय वर्षं ८३असलेल्या बाबू दाजी सावर्डीकर यांनी फिनलँड येथे वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेत उंच उडी,लांब उडी,तिहेरी उडी या क्रीडा प्रकारात तसेच मलेशिया-सिंगापूर येथे व्हालीबॉल, बास्केटबॉल मध्ये लक्षवेधी कामगिरी केल्याबद्दल त्यांचा आमदार सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पदक देऊन सत्कार करण्यात आला. यासोबतच यवतमाळ जिल्ह्यातील ७५ वर्ष वय असलेले यशवंत इसरानी यांनी डेहराडून व कलकत्ता येथील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत उंच उडी,लांब उडी मध्ये सुवर्ण पदक तथा भालाफेक मध्ये तिसरा क्रमांक पटकावला.त्याबद्दल त्यांचा सुद्धा यावेळी यथोचित सन्मान करण्यात आला.

# मध्य रेल्वेच्या ७९ रेल्वे स्थानकांवर 'एक स्टेशन एक उत्पादन'

## स्थानिक पातळीवर ६१ विविध लोकप्रिय उत्पादनाची विक्री, ओएसओपी लाभार्थ्यांना २.४७ कोटीचे उत्पन्न

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक बडनेरा –** मध्य रेल्वे मुंबई विभागाने 'वोकल फॉर लोकल' व्हिजनला प्रोत्साहन देणे आणि स्थानिक/स्वदेशी उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी ७९ रेल्वे स्थानकावर ६१ प्रकारच्या लोकप्रिय वस्तू, साहित्य विक्री नोंदणीकृत ओएसओपी केंद्रावर होत आहे. लाभार्थ्यांनी आतापर्यंत २.४६ कोटीचे उत्पन्न मिळवले आहे.

केंद्र सरकारच्या 'वोकल फॉर लोकल' व्हिजनला प्रोत्साहन देण्यासाठी, स्थानिक/स्वदेशी उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि उत्पन्नाच्या अतिरिक्त संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने रेल्वे मंत्रालयाने भारतीय रेल्वेवर 'वन स्टेशन वन प्रॉडक्ट' (ओएसओपी) योजना सुरू केली होती. या योजनेंतर्गत समाजातील उपेक्षित घटक, स्वदेशी/स्थानिक उत्पादनांचे प्रदर्शन, विक्री आणि उच्च दृश्यमानता देण्यासाठी रेल्वे स्थानकांवर ओएसओपी आउटलेट दिले जातात. योजनेची सुरूवात २५ मार्च २०२२ रोजी सुरू झाली आणि २१ नोव्हेंबर




२०२३ पर्यंत संपूर्ण राज्यात ७४ रेल्वे स्थानकांवर ७९ ओएसओपी आउटलेट्सने आहेत. हे ओएसओपी स्टॉल्स नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ डिझाईन, अहमदाबाद यांनी संपूर्ण रेल्वेमध्ये एकरूपतेसाठी डिझाइन केले आहेत.

### बडनेरा येथील सांभारवडी, शेगावच्या उदबत्तीची विक्री

राज्यातील रेल्वे स्थानकांवरील ओएसओपी आऊटलेट्सवरील विविध उत्पादनांमध्ये अहमदनगर येथील केळी, द्राक्षे, पापड, लोणचे; बडनेरा येथील सांबरवडी; छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे चामड्याची उत्पादने; चिंचवड येथील घरगुती अगरबत्ती, धूप, साबण, फिनाइल; चर्चगेट येथील चामड्याची उत्पादने; गोरेगाव येथील खादी उत्पादने; इगतपुरी येथील हंगामी फळे आणि पपई, द्राक्षे, सफरचंद, लोणचे, पापड यासह हाताने बनवलेली कोल्हापुरी चप्पल; कणकवली व कुडाळ येथे लाकडी खेळणी; लोणावळा येथे चिक्की व फज उत्पादने; नाशिकरोड येथील पैठणी साड्या; पंढरपूर येथील विठ्ठल मूर्ती, कुमकुम, अगरबत्ती व इतर पुजेचे साहित्य; नागपूर येथील बांबूचे साहित्य; परळ येथील टेक्सटाईल आणि हातमाग; पिंपरी येथे हाताने बनवलेल्या पर्स बॅग (कागद आणि कापडापासून बनवलेल्या); सातारा येथील कंदी पेढा; शेगाव येथील पापड; सोलापूर येथील सोलापुरी चादर, बेडशीट आणि टॉवेल; वापी आणि बोरिवली येथे वारली कला आणि हस्तकला; वसई रोड आणि नालासोपारा येथे सॉफ्ट टॉईज यांचा समावेश आहे.

### स्थानिक वस्तू, साहित्य विक्री

'वन स्टेशन वन प्रोडक्ट' हे त्या-त्या ठिकाणासाठीचे वैशिष्ट्य आहे आणि त्यात स्थानिक जमातींनी बनवलेल्या कलाकृती, स्थानिक विणकरांच्या हातमाग, जगप्रसिद्ध लाकूड कोरीव काम, चिकनकारी आणि झारी-जरदोजी यांसारख्या हस्तकला, कपड्यांवरचे काम किंवा चहा, कॉफी आणि इतर प्रक्रिया केलेले मसाले यांचा समावेश आहे. अर्ध-प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ/उत्पादने या भागात स्वदेशी उगवले जातात. त्याच वस्तू, साहित्याची विक्री केली जाते.

# टीम इंडियाच्या युवा ब्रिगेडचा जलवा!

## ऑस्ट्रेलियाला दुसऱ्या सामन्यातही दिला दणका

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई –** भारतीय यंग ब्रिगेडने दुसऱ्या ट्वेंटी-२० सामन्यातही ऑस्ट्रेलियावर विजय मिळवला आणि ५ सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी दिली. यशस्वी जैस्वाल, इशान किशन व ऋतुराज गायकवाडच्या वैयक्तिक अर्धशतक आणि रिंकू सिंगच्या फिनिशिंग टचने भारताला मोठी धावसंख्या उभारून दिली. त्यानंतर रवी बिश्नोईने पुन्हा एकदा फिरकीच्या जाळ्यात कांगारूंना अडकवले. प्रसिद्ध कृष्णाने भन्नाट यॉर्कर टाकले.

यशस्वी २५ चेंडूंत ९ चौकार व २ षटकारांच्या मदतीने ५३ धावांवर झेलबाद झाला. यशस्वी व ऋतुराज यांनी ५.५ षटकांत ७७ धावांची भागीदारी केली. इशानने ३२ चेंडूंत ३ चौकार व ४ षटकारांसह ५२ धावा चोपल्या आणि ऋतुराजसह ५८ चेंडूंत ८७ धावा जोडल्या. ऋतुराजने ४३ चेंडूंत ३ चौकार व २ षटकारांसह ५८ धावा केल्या. रिंकूने ९ चेंडूंत ४ चौकार व २ षटकारांची नाबाद ३१ धावांची खेळी केली आणि टीम इंडियाने २० षटकांत ४ बाद २३५ धावा उभ्या केल्या.

मॅथ्यू शॉर्ट व स्टीव्ह स्मिथ यांनी ऑस्ट्रेलियाला आक्रमक सुरुवात करून दिली, परंतु रवी बिश्नोईने तिसऱ्या षटकात भारताला विकेट मिळवून दिली. शॉर्ट १९ धावांवर त्रिफळाचीत झाला. बिश्नोईने त्याच्या पुढच्या षटकात जोश इंग्लिसला बाद करून ऑसींनी खूप मोठा धक्का दिला. त्यात सहाव्या षटकात अक्षर पटेलने ग्लेन मॅक्सवेलची (१२) विकेट मिळवली. प्रसिद कृष्णाने त्याच्या दुसऱ्या अन् सामन्यातील ८व्या षटकात अनुभवी स्मिथची (१९) विकेट मिळवून दिली. टीम डेव्हिड व मार्कस स्टॉयनिस यांनी ऑस्ट्रेलियाला आशेचा किरण दाखवला होता. दोघांनी ६ षटकांत ८१ धावांची भागीदारी करून सामना ऑसींसाठी जीवंत ठेवला होता.



पुन्हा बिश्नोईने भागीदारी तोडली. टीम डेव्हिड २२ चेंडूंत ३७ धावांवर झेलबाद झाला. बिश्नोईने त्याच्या ४ षटकांत ३२ धावा देताना ३ विकेट्स घेतल्या. मुकेश कुमारने १५व्या षटकांत स्टॉयनिसची विकेट घेतली. स्टॉयनिसने २५ चेंडूंत २ चौकार व ४ षटकारांसह ४५ धावा केल्या. या विकेटने ऑस्ट्रेलियाच्या विजयाच्या आशा मावळल्या. कृष्णाने (३-४१) पुढील षटकात सीन एबॉटचा (१) त्रिफळा उडवला. त्याच षटकात कृष्णाने नॅथन एलिसचा त्रिफळा उडवला. मॅथ्यू वेडने (नाबाद ४२) अखेरपर्यंत खेळ करून ऑस्ट्रेलियाला ९ बाद १९१ धावांपर्यंत पोहोचवले. भारताने ४४ धावांनी सामना जिंकला.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विदर्भ प्रांतात जबाबदारी बदल, तामशेट्टीवार नवे प्रांत संघचालक

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विदर्भ प्रांताच्या जबाबदार्यांमध्ये बदल करण्यात आला आहे. क्षेत्र कार्यकारिणी सदस्य दीपकराव तामशेट्टीवार यांच्याकडे प्रांत संघचालकपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. याअगोदर राम हरकरे यांच्याकडे हे पद होते. संघाच्या स्थापनेला शंभर वर्ष लवकरच पूर्ण होणार आहे. तसेच पुढील निवडणूकांमध्ये मतदान वाढीवर संघाचा भर राहणार आहे. अशा स्थितीत संघ मुख्यालयाचे स्थान असलेल्या विदर्भातील हे बदल



महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

विदर्भ प्रांताच्या कारंजा घाडगे येथे आयोजित बैठकीदरम्यान ही घोषणा करण्यात आली. तामशेट्टीवार हे मुळचे चंद्रपूर जिल्ह्यातील नवरगाव येथील असून त्यांनी संघात विविध जबाबदार्यांवर काम केले आहे. नागपूर महानगराचे सहसंघचालक श्रीधरराव गाडगे यांच्याकडे प्रांत सहसंघचालकपद देण्यात आले आहे. मागील अनेक वर्षांपासून ते नागपूर महानगराची जबाबदारी सांभाळत होते. ते चंद्रशेखर राठी यांची जागा घेतील. विदर्भ प्रांताची उर्वरित कार्यकारिणी कायम असेल अशी माहिती देण्यात आली आहे.

# मध्य रेल्वेच्या बडनेरा मार्गे महापरिनिर्वाण दिनासाठी १० विशेष गाड्या

## ४ ते ८ डिसेंबर दरम्यानचे वेळापत्रक जाहीर

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक बडनेरा**

मध्य रेल्वे मुंबई विभागाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी ६ डिसेंबर रोजी भीम अनुयायी मोठ्या संख्येने दादर, मुंबईकडे येतात. या दरम्यान होणारी प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता बडनेरा मार्गे होत १० अनारक्षित विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. ४ ते ८ डिसेंबर या कालावधीत या गाड्या धावणार आहे.

यात ३ विशेष नागपूर ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई, ६ विशेष मुंबई/ दादर ते सेवाग्राम/ अजनी/ नागपूर आणि



१ विशेष अजनी ते मुंबई चालविण्यात येईल. या गाड्यांना नागपूर, अजनी, सेवाग्राम, वर्धा, पुलगाव, धामणगाव, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, जलंब, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कसारा, कल्याण, दादर आणि मुंबई रेल्वे स्थानकावर थांबे देण्यात आले आहे. यात १६ अथवा १२ सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे असणार आहे.

### अशा धावतील विशेष गाड्या

ट्रेन क्र. ०१२६२ नागपूर येथून ४ डिसेंबर रोजी २३.५५ वाजता सुटेल आणि मुंबई येथे दुसर्या दिवशी १५.३० वाजता पोहोचेल.

ट्रेन क्र. ०१२६४ नागपूर येथून ५ डिसेंबर रोजी ८ वाजता सुटेल आणि मुंबई येथे त्याच दिवशी २३.४५ वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०१२६६ नागपूर येथून ५ डिसेंबर रोजी १५.५० वाजता सुटेल आणि मुंबई येथे दुसर्या दिवशी १०.५५ वाजता पोहोचेल.

ट्रेन क्र. ०१२४९ मुंबई येथून ६ डिसेंबर रोजी १६.४५ वाजता सुटेल आणि अजनी येथे दुसर्या दिवशी ९.३० पोहोचेल.

ट्रेन क्र. ०१२५१ ही ६ डिसेंबर रोजी १८.३५ वाजता मुंबई येथून सुटेल आणि सेवाग्राम येथे दुसर्या दिवशी १०.३० वाजता पोहोचेल.

ट्रेन क्र. ०१२५३ ही ७ डिसेंबर रोजी दादर येथून १२ वाजून ४० मिनिटांनी सुटेल आणि अजनी येथे त्याच दिवशी १५.५५ वाजता पोहोचेल.

ट्रेन क्र. ०१२५५ ही ७ डिसेंबर रोजी १२.३५ वाजता मुंबई येथून सुटेल आणि नागपूर येथे दुसर्या दिवशी ३.०० वाजता पोहोचेल.

गाडी क्र. ०१२५७ ही ८ डिसेंबर रोजी १८.३५ वाजता मुंबई येथून सुटेल आणि नागपूर येथे दुसर्या दिवशी १२.१० वाजता पोहोचेल.

ट्रेन क्र. ०१२५९ ही ८ डिसेंबर रोजी दादर येथून रात्री १२ वाजून ४० मिनिटांनी सुटेल आणि अजनी येथे त्याच दिवशी १५.५५ वाजता पोहोचेल

सुपरफास्ट स्पेशल ट्रेन क्र. ०२०४० अजनी येथून ७ डिसेंबर रोजी १३.३० वाजता सुटेल आणि मुंबई येथे दुसर्या दिवशी ४.१० वाजता पोहोचेल.

# श्री गुरुनानक देव जन्मोत्सव च्या ५५४ व्या प्रकाश पर्वावर नानकवाणीतून मानवतेची शिकवण

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

श्री गुरुनानक देव यांचा जन्मदिवस संपूर्ण भारत देशात दरवर्षी गुरुनानक जयंती म्हणून पौर्णिमेला साजरा केला जातो. गुरुनानक देव यांनी समाजाला दिलेला सगळ्यात महत्त्वाचा संदेश म्हणजे ' ईश्वर एक आहे,आणि चराचरात त्याचे वास्तव्य आहे 'हा होता.त्यांनी समाजाला दिलेला हा अमूल्य संदेश आजदेखील अजरामर आहे. आपला कर्ता,धर्ता आणि पिता सारे काही परमेश्वरच आहे. त्यामुळे आपण सर्वांनी एकमेकांसोबत प्रेमपूर्वक भावनेने वागले पाहिजे, असा प्रेमळ अर्थ त्यांनी दिलेल्या शिकवणीचा आहे. गुरू नानकदेव यांची मानवतावादावर दृढ श्रद्धा होती. त्यांचे चिंतन धर्माच्या सत्य व शाश्वत मूल्यांचे मूळ होते.म्हणूनच जात-धर्म या पलीकडे



जाऊन सर्वांनी एकत्र यावे अशी त्यांची इच्छा होती.असे प्रतिपादन आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी श्री गुरुनानक देवजी यांच्या जन्मोत्सव कार्यक्रमात उपस्थितांना संबोधून केले. सोमवार दिनांक २७ नोव्हेंबर २०२३ रोजी राजापेठ-बुटी प्लॉट परिसर स्थित गुरुद्वारा गुरूसिंघ सभा येथे गुरू नानकदेवजी यांचा जन्मदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. संपूर्ण देशात श्री गुरुनानक देवजी यांचा जन्मदिन ' प्रकाशदिन ' म्हणून साजरा केला जातो. याच शृंखलेत अमरावती येथे गुरुद्वारा गुरूसिंघ सभा येथे विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये बालगोपालांचा कवी दरबार,अखंड पाठ साहिब,कीर्तन दिवाण,अरदास,गुरू का लंगर अर्थातच महाप्रसाद आदींसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी आमदार सौ. सुलभाताई खोडके व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष,प्रवक्ते,विधिमंडळ समनवयक-संजय खोडके यांनी गुरुद्वारा गुरुसिंघ सभा येथे भेट दिली.

# शासनाने वन प्राण्यांचा बंदोबस्त करा नाहीतर वनप्राणी मारण्याचे लायसन्स तरी द्या



**दि२७ विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर**

दर्यापूर तालुक्यात प्रथमच सुरुवातीपासून पावसाने उघडझाप केली त्यामुळे उभी पिक सुकण्याच्या मार्गावर होती असे असताना अचानक चांगल्या दमदार पावसाची एन्ट्री झाल्याने मुगाचे किंवा उडदाचे पीक हातातून गेले तरीपण चांगला पाऊस आल्याने शेतकरी सुखावला होता मात्र परतीच्या पावसाची वाट पाहत असताना पुन्हा निसर्गाने कोप केला आणि शेतकरी हताश होऊन आभाळाकडे पाहू लागला मात्र परतीच्या पावसाचे नाव दिसत नाही मग कसेबसे पीक उभे आहे असे असताना आता रानडुकरांनी वन्यप्राण्यांनी शेतामध्ये हैदोष सुरू केल्याने पुन्हा शेतकरी अडचणीत आला असून रानडुकरांचा बंदोबस्त वनविभागाने करणे काळाची गरज असल्याचे हर्षद पाटील साखरे या युवा शेतकर्याने मत व्यक्त केले आता तरी शासनाने वन प्राण्यांचा बंदोबस्त करावा नाहीतर वनप्राणी मारण्याचे लायसन तरी द्यावे अशी मागणी युवा शेतकरी त्याचा सुशिक्षित बेरोजगार हर्षद साखरे माऊली धांडे यांनी मागणी केलेली आहे.

# अचलपूर बाजार समितीत मका व सोयाबीन एकाच दिवशी ४५ हजार पोत्यांची विक्रमी आवक

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक परतवाडा**

अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये २३ नोव्हेंबर रोजी मोठ्या प्रमाणात मका व सोयाबीनच्या धान्याची आवक झाल्याने शेतकर्यांच्या धान्य भरलेल्या वाहनांना उभे राहण्यासाठी जागाही अपुरी पडत होती. सकाळपासून सुरू झालेल्या आवकीमुळे बाजार समितीत शेतकरी व धान्याच्या पोत्यांची गर्दी सर्वत्र दिसून येत होती.

एकाच दिवशी एवढी आवक झाल्याने बाजार समिती सभापती, संचालक व कर्मचार्यांनी विशेष लक्ष ठेवून लवकरात लवकर माप करण्याची यंत्रणा सक्रिय केली. अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत मका २५ हजार पोते तर सोयाबीनची २० हजार पोत्यांची आवक झाली. बाजार समितीत अडत्या व्यापार्यांनी बोली बोलत हर्रासात भाग घेऊन धान्य खरेदीला प्राधान्य दिले. बाजार समितीत मका १६०० ते २५०० रुपये प्रति क्विंटल तर सोयाबीन ४८०० ते ५१५० या दरात खरेदी करण्यात आले.



**संचालक घोडेराव सक्रिय**

अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत गुरवारी मोठ्या प्रमाणात आवक वाढल्याने बाजार समिती यंत्रणा सक्रिय होतीच. सोबतच संचालक पोपट घोडेराव शेतकर्यांच्या धान्य मालाचे माप लवकरात लवकर कशा प्रकारे होईल, याकडे लक्ष देऊन होते.

### शेतकऱ्यांना तत्काळ चुकारा

बाजार समितीत शेतकर्यांनी धान्य विक्रीला आणल्यानंतर हर्रास होताच तत्काळ खरेदी व मोजमाप करत शेतकर्यांना नगदी, आरटीजीएस व धनादेश देऊन चुकारा केल्या जातो. त्यामुळे शेतकरी योग्य भाव व नगदी चुकारा असल्याने या बाजार समितीला प्राधान्य देतात .

**सतीश व्यास, संचालक, बाजार समिती**

**सुविधेला प्राधान्य**

अचलपूर बाजार समितीतील शेतकरी, अडत्या, व्यापारी, हमाल, मापारी यांच्या माध्यमातून आवश्यकत्या सुविधा बाजार समितीत उपलब्ध करून दिल्या जात आहे. याकरिता सभापती राजेंद्र गोरले व उपसभापती अमोल चिमोटे, संचालक मंडळ, सचिव अमर वानखडे, सहसचिव मंगेश भेटाळू आदी सक्रिय असून लक्ष देऊन आहेत.

# नेत्यांची घरं जाळायला येणाऱ्यांचे हात कलम करू, शेंडगेंच्या विधानावर आव्हान देत जरांगे-पाटील म्हणाले

**दि. २७ विदर्भ प्रजासत्ताक हिंगोली**

हिंगोलीत रविवारी ( २६ नोव्हेंबर ) दुसरा 'ओबीसी एल्गार मेळावा' पार पडला. या सभेतून ओबीसी नेते, प्रकाश शेंडगे यांनी आमच्या नेत्यांचे घरे जाळायला येणाऱ्यांचे हात कलम करू, असा इशारा दिला होता. याला मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. मी जातीसाठी पाय तोडून घेण्यास तयार आहे, असं आव्हान जरांगे-पाटलांनी दिलं आहे. ते प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होते.



**प्रकाश शेंडगे काय म्हणाले?**

आता पिस्तूल आणि काडतुसे सापडली आहेत. असलं आंदोलन असतं का? आम्ही तुमच्यावर खडाही टाकत नाही. जे हात आमच्या कार्यकर्त्यांची आणि नेत्यांची घरे जाळण्यास येतील, ते कलम केले जातील, असं विधान प्रकाश शेंडगे यांनी केलं होतं.

यावर जरांगे-पाटलांनी म्हटलं, या वयात पाय आणि हात तोडण्याची भाषा करत आहेत. पाय तोडायला यावे. मी जातीसाठी पाय तोडून घेण्यास तयार आहे.

# माधान येथे गुलाबराव महाराज हरिनाम सप्ताह

## ३ ते ११ डिसेंबर दरम्यान आयोजन

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार**

चांदुरबाजार तालुक्यातील श्री क्षेत्र माधान येथे ३ ते ११ डिसेंबर दरम्यान ज्ञानेशकन्या श्री संत गुलाबराव महाराज हरिनाम सप्ताह आयोजिण्यात करण्यात आला आहे. या उत्साहासाठी माधान येथील श्री संत गुलाबराव महाराज संस्थान कामाला लागले आहे.यावर्षी श्री'चा १४२ वा स्मृति महोत्सव विविध धार्मीक व समाज प्रबोधनपर कार्यक्रमाद्वारे आयोजन होणार आहे. ३ डिसेंबरला (रविवारी) रामप्रहरी तिर्थस्थापना, पादुका पुजन, काकड आरती हरिभक्तपारायन कैलास महाराज कराळे आणि गौरव ज्ञानेश्वरराव मोहोड यांच्या हस्ते होणार आहे.यात सप्ताहातील पहिले भोजन माधान येथील गोरले कुटुंबियाकडून दिल्या जाणार आहे हि परपरा गोरले कुटुंबियांनी



तीन पिढ्यापासून सुरु ठेवली असून आजही कायम आहे. सप्ताहातील दैनंदीन कार्यक्रमामध्ये सकाळी रामधून व बौध्दिक, त्यानंतर ८ ते ९ वाजेदरम्यान भक्तपदतिर्थामृत परायण होणार आहे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तृप्ती खोडे आणि लक्ष्मी मोहोड करणार आहेत. दैनंदिन कार्यक्रमामध्ये सकाळी १० ते १२ वाजेदरम्यान श्रीमद्भागवतकथेचे पठन भागवताचार्य श्रीभगिरथ महाराज काळे (नाशिक) करणार आहेत. सायंकाळी ६ ते ७ वाजेदरम्यान ज्ञानेशकन्या हरिपाठ मंडळाकडून हरिपाठाचा कार्यक्रम सुरवात होणार या कार्यक्रमाचे संयोजक श्री जीवन महाराज मोहोड आहेत. सप्ताहा दरम्यान रात्री ८ ते ११ वाजेपर्यंत अनुक्रमे किर्तनाचा कार्यक्रम होईल. या मध्ये हरिभक्तपरायण डॉ. अरविंद महाराज देशमुख, श्री. पंकज महाराज पवार, श्री. अक्षय महाराज बोरडे, श्री. भगिरथ महाराज काळे (नाशिक), पंकज महाराज पोहोकार, शिवेंद्र महाराज काळे, रमेश महाराज दुधे यांचा हरिकिर्तनाचा कार्यक्रम होईल. १० डिसेंबरला दुपारी १.०० वाजता हरिभक्त महाप्रसादाचा लाभ घेतील. त्याच दिवशी रात्री ८ ते १० वाजेपर्यंत भजन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये पंचकृशीतील भजन मंडळी सहभागी होतील, ११ डिसेंबरला रामप्रहरी श्री शोभायात्रा काढण्यात येईल. त्यानंतर दहीहांडी कार्यक्रम होईल, व अहवाल वाचन होईल. या दिवशीचा महाप्रसाद मोरेश्वर मोहोड व प्रदीप मोहोड यांच्याकडे राहील.अश्या विविध उपक्रमांनी संत श्री गुलाबराव महाराज यांचा सप्ताह साजरा होणार आहे

# आठ तासात सरासरी १३.८ मिमी पाऊस, कापूस भिजला, तुरीवर अळ्यांचा धोका

**दि. २७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

दोन-अडीच महिन्यांनंतर जिल्ह्यात पावसाची नोंद झालेली आहे. आठ तासात सरासरी १३.८ मिमी नोंद झालेली आहे. हा अवकाळी पाऊस हरभऱ्यासाठी पोषक ठरला तर वेचणी राहिलेल्या शेतातला कापूस ओला झाला. शिवाय ढगाळ वातावरण व पावसामुळे तुरीवर शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता वाढली भाजीपाला पिकांचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे.

वातावरण बदलाने दोन दिवसांपासून जिल्ह्यात ढगाळ वातावरण असल्याने तापमानात कमी आलेली आहे. अशातच रविवारी रात्री एक ते दीडपासून पावसाला सुरुवात झाली. सोमवारी दुपारी १२ पर्यंत पावसाची रिपरिप सुरुच होती. या पावसामुळे अनेकांची तारांबळ उडाली. बाजार समिती दोन दिवसांपासून बंद आहे व पावसाळी वातावरणामुळे मंगळवारी बंद ठेवण्यात आल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान टळले आहे.

# दर्यापूर शहरात एकाच रात्री तीन घरफोड्या; सोन्या-चांदीचे दागीनेसह रोख रक्कम लंपास

**दि२७ विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर**

शहरातील वेगवेगळ्या परिसरात एकाच रात्रीतून तीन बंद घरे फोडली असून सोन्या-चांदीच्या दागीन्यासह रोख रक्कम अज्ञात चोरट्यांनी लंपास केले आहे. वाढते चोर्यांचे घटनानमूळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण झाले आहे. चोरट्यांना पकडण्यासाठी पोलीसांनी ठोस उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. दर्यापूरातील नरुद्दीन कदीरोद्दीन (वय ४२) रा.अमन



कॉंलनी (दि.२४) रोजी सायंकाळी अंजनगाव सुर्जी येथे नातेवाईकांनकडे गेले होते. रात्र झाल्यामुळे त्यांनी तीथेच मुक्काम केला. शनिवार (दि. २५) ला घरी परत आले असता घरातील सामान अस्ताव्यस्त व कपाटातील रोख १० हजार अज्ञात चोराने लंपास केल्याचे उघडकीस आले. तसेच फिर्यादी नरुद्दीन कदीरोद्दीन यांच्या शेजारी राहणारे हरिनारायण मंडवे यांच्याही घराचा कुलुप कोडा तुटलेला व घरातील २ हजार चोरीला गेल्याचे समोर आले आहे. तीसर्या घटनेत गणेश कॉंलनी येथे सोमवंशी यांच्या घरी भाड्याने असलेले दामोदर सावनजी चांदूरकर यांच्या घराचा कुलुप-कोंडा तोडून आतील रुममधील कपाट फोडून त्यातील ५ ग्रॅंम सोन्याचे दागीने, ३५ ग्रॅंम चांदीचे विविध आभूषण व रोख ११ हजार असा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला असल्याचे शनिवारी उघडकीस आले असून या घटनेची वुत्तलिहीस्तोवर पोलीसात तक्रार दाखल झाली नव्हती.

गणेश नगरातील सोमवंशी यांच्याकडील भाडेकरु असलेले चांदुरकर यांच्या घरी चोरी झाली. विशेष म्हणजे सोमवंशी यांच्या घरासमोरच उपविभागीय पोलीस अधीकारी गुरुनाथ नायडू हे भाड्याने वास्तव्यास असतांना चक्क याच परीसरात चोरट्यांनी चोरी केल्याने जणमानसात चर्चेला पेव फुटले असून चांगलेच आश्चर्य व्यक्त होत आहे.

# गोंडवाना विद्यापीठात प्राचार्य, शिक्षकांच्या कागदपत्रांचे 'व्हेरिफिकेशन'; मग अमरावतीत का नाही?

**दि. २७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्यात बनावट नेट - सेट प्रमाणपत्रांचे प्रकरण गाजत असताना गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाने प्राचार्य, शिक्षकांच्या कागदपत्रांचे 'व्हेरिफिकेशन' करावे, असे परिपत्रक जारी केले आहे. मात्र, संत गाडगेबाबा अमरावतीविद्यापीठाने अद्याप बनावट नेट - सेट प्रकरणाची दखल घेतली नसल्याचे चित्र आहे.



केंद्रीय विद्यापीठ अनुदान आयोगाने वाशिम जिल्ह्याच्या कामरगाव येथील कला, विज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक सुरेंद्र चव्हाण यांनी डिसेंबर २००४मध्ये मिळविलेले राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) प्रमाणपत्र फेक असल्याचे जाहीर केले आहे. या गंभीरप्रकरणी सुरेंद्र चव्हाण यांच्यावर फौजदारी दाखल होणार आहे. तसेच अमरावती पोलिस आयुक्तांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे एकूण ३३ जणांचे नेट - सेट प्रमाणपत्र बनावट असल्याची तक्रार आहे. त्यापैकी पोलिसांनी १९ प्राध्यापकांच्या कागदपत्रांच्या पडताळणीसाठी विद्यापीठाकडे नावे पाठविली आहेत. पण, कुलसचिववगळता अमरावती विद्यापीठात कुलगुरू, प्र-कुलगुरूंचा कारभार प्रभारी सुरू आहे. बनावट नेट - सेटप्रकरण हे अमरावती विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात उघडकीस आले आहे. तरीही अमरावती विद्यापीठाकडून या प्रकरणाचा 'मास्टर माइंड' शोधण्यासाठी ठोस पाऊल उचलले जात नसल्याने शंका-कुशंका वर्तविल्या जात आहेत.

# जिल्ह्याला अवकाळी पावसानं झोडपले रब्बी पिकाला फायदा, फळबागांना फटका

**दि. २७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती जिल्ह्यात दोन दिवस ढगाळ वातावरण निर्माण झाल्यानंतर आज सोमवार सकाळ पासून अवकाळी पाऊस पडण्यास सुरुवात झाली आहे. अमरावती शहरात आज सकाळी पावसाने चांगलेच झोडपले. या पावसाचा फायदा रब्बी पिकाला होणार असला तरी भाजीपाला व् फळबाग़ पिकांना मोठ्या प्रमाणात फटका बसणार असल्याने



शेतकऱ्यांत चिंता आहे.तर कापुस आणि तुर पिकांचे जिल्ह्यात मोठ्या प्रामनत नुकसान जले असल्याचे समोर आले आहे

नोव्हेंबर महिना संपत आलातरी अजुनही थंडीला जोर नाही. त्यातच दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण तयार होत होते. हवामान विभागानेही अवकाळी पावसाचा अंदाज वर्तविलेला होता हा अंदाज जिल्ह्यात खरा होताना दिसून येत आहे. अमरावती सह जिल्ह्यातील काही भागात अवकाळीच्या पावसाने सकाळी तीन वाजल्यापासूनच हजेरी लावली. जवळपास १ तास मोठ्या प्रमाणात पाऊस पडत होता. त्यानंतर हळूहळू पाऊस कमी झाला. मात्र, या पावसामुळे शहरातील रस्त्यावरुन पाण्याचे लोट वाहिले. तसेच रहदारीही कमी झाली होती.

## १२ टन संत्रा घेऊन ट्रकचालक पसार : चालकाविरूद्ध पोलिसांत तक्रार दाखल

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक वरूड**

येथील संत्रा ट्रॉन्सपोर्ट करणार्या व्यापार्याचा माल वाहून नेणार्या चालकानेच ३ लक्ष रूपयांचा १२ टन संत्रा घेऊन पोबारा केल्याची घटना २४ नोव्हेंबर रोजी उघडकीस आली आहे. या प्रकरणी व्यापार्याने वाहतूक करणार्या चालकाविरूद्ध पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहसीन बेग आबिद बेग मिर्झा (३६) रा. वरूड हे संत्रा ट्रान्सपोर्ट करणारे व्यापारी असून संत्रा किंवा मोसंबीकरिता ट्रीप मिळवून देण्याचा व्यवसाय करीत असतात. मोहसीनने सोनू उर्फ रफी (३०) रा. कशीया (उ.प्र) याला १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता वरूड येथील गजानन महाराज मंदिराजवळील ट्रॉन्सपोर्ट कंपनीतून पाटणा (बिहार) येथील हाजी सिराज खान जे. जे. फ्रुट कंपनी यांच्याकडे ट्रकने संत्र्याचा माल नेण्याकरिता पाठविले होते. परंतु सोनू हा निर्धारित वेळेत सिराज खान यांच्याकडे माल घेऊन पोहचला नाही. त्यामुळे त्याने सोनूसोबत फोनवर संपर्क साधला असता तुझा माल मला माहित नसल्याचे सांगितले. यावरून सोनुने मोहसीनचा विश्वासघात करून ३ लक्ष रूपयांचा १२ टन संत्र्याची परस्पर विल्हेवाट लावून मोहसीनची फसवणूक केल्याचे उघड झाले. याबाबतची तक्रार मोहसीनने पोलिसांत दाखल केली आहे. तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी ट्रकचालकाविरूद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# सावधान ! आता वनविभागही रोखणार अमली पदार्थांची तस्करी ?

## वनविभागाचे नाके ठरणार तस्करांसाठी अडचणीचे



**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमली पदार्थांची तपासणी करण्याचे काम येत्या काही दिवसांत वनविभागाकडे येणार असल्याची माहिती समोर आली आहे. अनेक ठिकाणी वनविभागाचे तपासणी नाके आहेत. या ठिकाणी आतापर्यंत वन्यप्राणी शिकारसंदर्भात व लाकूड तस्करीबाबत कारवाया केल्या जायच्या. आता हे नाके अमली पदार्थांचीही तपासणी करणार आहेत, अशी खात्रिलायक माहिती आहे.

यात उल्लेखनीय असे की, या अतिरिक्त कामामुळे वनविभागाचे जंगलाचे व वन्यप्राण्यांचे संरक्षण, रोपटे लागवड या कामांकडे दुर्लक्ष होईल का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.सध्या अमली पदार्थांची तपासणी पोलिस विभाग व नार्को टेस्ट विभागाकडे आहे. यामध्ये अमली पदार्थ एखाद्या व्यक्तीकडे आढळून आल्यास त्याच्यावर संबंधित पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात येतो. सध्या राज्यात अनेक ठिकाणी शेतात गांजाच्या झाडांची लागवड मोठ्या प्रमाणात करून त्याची तस्करी करताना अनेकांना अटक झाली आहे. गांजा शेतात लावणाऱ्या व्यक्तीविरुद्धही कारवाई झाली आहे. गांजासोबत अनेक अमली पदार्थांच्या तस्करीमध्ये राज्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

गांजा शेतात लावणाऱ्या व्यक्तीविरुद्धही कारवाई झाली आहे. गांजासोबत अनेक अमली पदार्थांच्या तस्करीमध्ये राज्यात मोठ्या प्रमाणात नी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. वनविभागाचे राज्यात अनेक ठिकाणी तपासणी नाके आहेत. या नाक्यावर शिकारी व लाकडे अवैधरीत्या नेत आहे का, म्हणून वाहनाची तपासणी केली जाते. या ठिकाणी आता अमली पदार्थांची तपासणीही केली जाणार आहे. शासनाने वनविभागाला ही जबाबदारी सोपविली आहे, ते योग्यही आहे. परंतु राज्यात अनेक क्षेत्रांत गांजाची लागवड केली जाते. त्याची तपासणी वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी कशी काय करेल, हा प्रश्न सध्या तरी अनूत्तरीत आहे.

### वनकर्मचाऱ्यांमध्ये चर्चा

काही वनकर्मचारी या नव्याने येणाऱ्या अमली पदार्थांची तस्करी रोखण्याच्या जबाबदारीबाबत बोलताना दिसून आले. यातील काही जण तर हे अतिरिक्त कामही आपल्याकडे आल्यावर रुटीन कामे कशी करायची, याचा विचार करताना दिसले. याबाबतवनपरिक्षेत्र अधिकारीयांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी याबाबत अद्याप आदेश आले नसल्याचे सांगितले.

### आधीच वनविभाग अनेक कामांत व्यस्त

वनविभागाकडे जंगल व वन्यप्राणी सुरक्षितता, वन्यप्राण्यांकडून: मानवावर झालेले हल्ले, हल्ले होऊ नये, यासाठी करावयाची उपाययोजना, वन्यप्राण्यांकडून शेतातील पिकांचे नुकसान झाल्यास त्याचे पंचनामे करणे, वृक्षलागवड करणे, रोपवाटिका तयार करणे अशी अनेक कामे आहेत. यात आता वनविभागाकडे अमली पदार्थ तपासणीचे आदेश येत्या काही दिवसांत निघणार असल्याने वनविभागाचे त्याच्या उपरोक्त कामांकडे दुर्लक्ष तर होणार नाही ना, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# अशैक्षणिक कामाच्या अनुषंगाने शिक्षण संचालकांची महत्त्वाची बैठक

## राज्यस्तरीय समिती गठीत : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती

**दि२७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**



मंगळवार दि.२१ रोजी प्राथमिक शिक्षक संचालनालय पुणे येथे मा.शरद गोसावी साहेब यांच्या अध्यक्षतेखालीप्राथमिक शिक्षकांना देण्यात येणाऱ्या अशैक्षणिक कामाच्याअनुषंगाने शिक्षण संचालकांची महत्त्वाची आणि तातडीची बैठक घेण्यात आली महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती म्हणून राज्य उपाध्यक्ष राजन सावंत यांनी शिक्षक समितीची भूमिका विशद केलीबैठकीतील चर्चेचे प्रमुख मुद्दे- शिक्षण विभागांचीच व शिकविण्याशी संबंधित कामेच शिक्षकांना द्या. (असा ठराव-राज्य मंत्रिमंडळ बैठकीत व्हावा.),शालेय पोषण आहार यंत्रणा- त्रयस्थ यंत्रणेमार्फत राबवावी.(अभिलेखे ठेवणे, नोंदी यास आर्थिक बाबही त्यासोबत असावी.),बीएलओ काम २१ प्रकारच्या कर्मचाऱ्यांनी करणे अपेक्षित आहे-यामध्ये प्राथमिक शिक्षक ८ नंबर ला आहेत. या कामातून कायमस्वरूपी मुक्तता व्हावी.राज्यस्तर गुणवत्ता वाढीचा उपक्रम एकच असावा प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळे नको.१०० % शाळांचे प्रतिवर्षी होणारे ऑडिट थांबवून ते रँडम पद्धतीने ५% टक्के प्रमाणे असावे.शासन स्तरावरील सर्व शिष्यवृत्ती-प्रतिवर्षी रिनोवेशन चे काम शासनाने करावे.जोपर्यंत प्रत्येक गावात निवासस्थान शासन उपलब्ध करून देत नाही तोपर्यंत मुख्यालयी राहण्याची सक्ती नको. मुख्यालयी निवासाच्या नावाखाली घरभाडे भत्ता कपात नकोच. ६ सप्टेंबर २०२३ रोजी राज्य शासनाने प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या अशैक्षणिक कामाबाबत कमिटी ने शासनास या गोष्टी निदर्शनास आणून द्याव्यात.जपश्रळपश सह कोणतीही अशैक्षणिक कामे देऊ नयेत.शासन निर्णय१८ ऑगस्ट २००५, १ऑगस्ट २००९, आरटीई ऍक्ट २००९, २०१३- याही परिपत्रकांचा अभ्यास व्हावा. 'महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती' म्हणून शासनाशी झालेले पत्र व्यवहार व मागणी शिक्षकांना शिकवू द्या,विद्यार्थ्यांना शिकू द्या अशाप्रकारची महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ची ठाम भूमिका शासनाला कळवावी. ११ डिसेंबरच्या नागपूर हिवाळी विधिमंडळावर होणाऱ्या मोर्चातून आम्ही ते व्यक्त करत आहोतच तसेचशालेय पोषण आहाराचे कामकाज जरी विद्यार्थ्यांशी संबंधित असले तरी ते अशैक्षणिक स्वरूपाचे आहे. त्यामुळे शासनाने त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने २०१४ मध्ये दिला आहे. त्याविरोधात शासनाने केलेली पुनर्विलोकन याचिका ही न्यायलयाने नुकतीच फेटाळली आहे.या निर्णयाचा पाठपुरावा करून राज्यातील सर्व शिक्षक या कामातून मुक्त होवू शकतात.त्यामुळे याकडेही आयुक्तांकडे मागणी करु असे शिक्षक समितीचे राज्य उपाध्यक्ष राजन सावंत यांनी बैठकीत आवर्जून सांगितल्याचे राज्य प्रसिध्दीप्रमुख राजेश सावरकर यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

# मेळघाट मधील २१ गावांमध्ये कमी व्होल्टेजमुळे शेतकऱ्यांचे मोटरपंप बंद

## आजपासून आठ गावांना टँकरने पाणीपुरवठा

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक परतवाडा**

धारणी तालुक्यातील हरिसाल सर्कलमधील २१ गावांमध्ये कमी व्होल्टेजमुळे पाणीपुरवठा तसेच शेतकऱ्यांचे मोटरपंप बंद आहेत. दुसरीकडे प्यायला पाणी मिळत नसल्याने सोमवारपासून पहिल्या टप्प्यात आठ गावांना टँकरने पाणीपुरवठा केला जाणार आहे. त्याच्या निषेधार्थ आदिवासींनी महावितरणच्या नावे शिमगा केला, तर तत्काळ दखल घेण्याची



मागणी कॉंग्रेस तालुकाध्यक्ष महेंद्रसिंग गैलवार यांनी अधीक्षक अभियंत्यांकडे पत्राद्वारे केली.

धारणी व चिखलदरा तालुक्यातील हरिसाल, बोरी, कोठा, कोट, जांभू बोथरा, नांदुरी, कारा, सोसोखेडा, रोरा, मांगीया, चौराकुंड, चिखली, केशरपूर, भिरोजा, केली, तारुबांदा, पाटकहू, राणामालूर, घोटा, चित्री या जवळपास २१ गावांचा पाणीपुरवठा बंद आहे. त्यामुळे ग्रामस्थ नदीनाल्याचे पाणी पित आहेत. त्यामुळे साथरोगाची भीती आहे. सबब, शेतकऱ्यांसोबत आंदोलन करण्याचा इशारा गैलवार, जांबूच्या सरपंच भूमका कासदेकर, काराचे सरपंच श्यामलाल भिलावेकर, चिताराम धुर्वे, जयसम दहीकर, आदींनी दिला आहे.

### या गावात आजपासून टँकर

२१ गावांतील पाणीपुरवठा योजना कमी व्होल्टेजमुळे निकामी झाल्याने सोमवारपासून डिझेल इंजनद्वारे विहिरीतून पाणी काढून टँकरने जांबू, बोथरा, कोट, सोसोखेडा, नांदुरी, कारा, कोठा, आदी गावांना पुरविले जाणार आहे.

# खासदार डॉ. अनिल बोंडे जखमी : तिवसा येथील बैलगाडा स्पर्धेतली घटना

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक तिवसा**

तीवसा येथे रविराज देशमुख मित्र परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेली बैलगाडा शर्यत पाहत असताना अज्ञात समाजकंटकाने भिरकावलेल्या दगडामुळे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे जखमी झाले आहे. सदर घटना शनिवारी दुपारी पाच वाजताच्या दरम्यान घडली असून घटनेची पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे.

बैलगाडा शर्यतीचा शनिवार २५ नोव्हेंबर हा शेवटचा दिवस होता. अंतिम लढती सुरू असताना खासदार अनिल बोंडे तेथे पोहोचले. प्रेक्षकांमध्ये उभे राहून ते शर्यतीचा आनंद लुटत होते. तेवढ्यातच त्यांच्या पाठीमागे असलेल्या गर्दीतून चार ते पाच दगड एक अज्ञात व्यक्तीने भिरकावले. त्यातील एक दगड डॉ. बोंडे यांच्या सुरक्षारक्षकाच्या छातीवर, दुसरा दगड डॉ. बोंडे यांच्या पाठीवर डाव्या खांद्याच्या बाजूने लागला आणि अन्य दोन दगड बाजूने निघून गेले. सदर घटना घडताच तेथे गोंधळ उडाला. दगडाने डॉ. बोंडे यांना मुकामार



लागला असून सूज आली आहे. त्यांनी तातडीने उपचार घेतले. सदर घटनेची तक्रार महाराष्ट्र ग्राम दर्पणचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुबोध देशमुख यांनी तीवसा पोलीस ठाण्यात दिली आहे. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे चांगलीच खळबळ उडालेली आहे.

**दगड मारणारे सापडतील : डॉ. बोंडे**

सदर घटनेची पोलिस तक्रार दिलेली आहे. घटनेच्या वेळी ड्रोन कॅमेऱ्याने शूटिंग सुरू होते. त्यामुळे दगड मारणारे निश्चित सापडतील. दगड मानेवर व डोक्यावर लागला असता तर गंभीर दुखापत झाली असती. सुदैवाने व ईश्वराच्या कृपेने तसे झाले नाही. भ्याडपणे दगडफेक करणे निंदनीय आहे. पाठीमागून येऊन वार करणाऱ्यांची समोर येण्याची हिम्मत होत नाही. पण, पोलिस त्यांना शोधतील. माझी प्रकृती स्थिर असल्याचे खा. बोंडे यांनी सांगितले.

**शोध सुरू आहे : पोलिस**

प्राप्त तक्रारीवरून भादविच्या ३२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गर्दीतून ही घटना घडली आहे. ड्रोन कॅमेराचे फुटेज तपासून दगड मारणाऱ्यांचा शोध घेतला जाईल. घटनेचा गंभीरतेने तपास सुरू आहे, असे तिवसा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रदीप ठाकूर यांनी सांगितले.

# रुख्मिणीच्या माहेरात कौडण्यापूर येथे कार्तिक पौर्णिमा यात्रा महोत्सव;भाविका सोबत यशोमती ठाकुर यांची फुगळी

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक कोंडण्यापूर**

कार्तिक पोर्णिमी भक्त जन येती साधुजन येतिकोंडण्यापूरच्या वाळवंटी संत गोळा होती, चोख म्हणे नाम घेता भक्त होती दंग पंढरपूर नंतर विठ्ठल-रुख्मिणीचे हक्काचे घर समजले जाणारे विदर्भातील पंढरी रुख्मिणीचे माहेर श्री क्षेत्र कौडण्यापूर हे आहे. कौडण्यापुरात कार्तिकी पौर्णिमा



महोत्सव सुरू झाला असून राज्याच्या कोण्याकोपऱ्यातुन दिंड्या दिंढ्या सहभागी झाल्या आहेत कुऱ्हा येथून सर्व दिंड्या कौडण्यापुरला टाळ मृदुगच्या गजरात पायी रवाना झाल्या आहेत कॉंग्रेस नेत्या व आमदार यशोमती ठाकूर यांनी सर्व पालखीचे पूजन केल यावेळी यशोमती ठाकुर वारकऱ्या सोबत फुगळी खेळत आनंद व्यक्त केला.

# महाराष्ट्र राज्य आट्यापाट्या पुरुष संघाच्या कर्णधारपदी वीर अभिमन्यू क्रीडा मंडळाचे खेळाडू सर्वेश मेन यांची नियुक्ती

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

चेन्नई ( तामिलनाडु ) येथे २६ ते २९ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय आट्यापाट्या स्पर्धासाठी महाराष्ट्र राज्य आट्यापाट्या खेळाच्या नुकताच जाहीर झालेल्या महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी वीर अभिमन्यू क्रीडा मंडळ पन्नालालनगर चे खेळाडू सर्वेश मेन यांची निवड करण्यात आली अमरावती शहरामध्ये सार्वजनिक मैदान कमी होत असून मुलांना



खेळण्यासाठी काही दिवसांनी मैदान मिळतील कि नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे अश्या कठीण परिस्थिती मध्ये पन्नालालनगर मैदान जनतेसाठी सार्वजनिक मैदान मनुनच राहावे यासाठी मागील २५ वर्षीपासून जनतेसाठी आपल्या स्वतःजवळचे पैसे खर्च करून सर्व स्तरावर आक्रमक लढा देवून जनतेसाठी मैदान सार्वजनिक ठेवनारे मंडळाचे पदाधिकारी मिलिंद बांबल यांनी खेळाडूंसाठी मैदान खुले करून दिले आहे वीर अभिमन्यू क्रीडा मंडळ पन्नालाल नगर येथील कबड्डी तसेच आट्यापाट्या खेळामधील अनेक खेळाडू राष्ट्रीय तसेच राज्यस्तरावर खेळले आहे आणी त्यांनी अमरावती जिल्ह्याचे नाव गौरवाने उंचावले आहे तसेच नुकतेच आता मंडळाचे आट्यापाट्या खेळाडू सर्वेश मेन यांची महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी निवड झाली त्याबद्दल त्यांचे मंडळाचे पदाधिकारी माजी स्थायी समिती सभापती मिलिंद बांबल ,प्रशिक्षक प्रा.श्रीधर धाकुलकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी कर्णधार सर्वेश मेन यांचे अभिनंदन केले आहे